# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ...तर मी इंडिया आघाडीचे नेतृत्व करू शकते; ममता बॅनर्जींचं मोठं विधान, काँग्रेसला मेसेज?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७कोलकाता**

इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्यावरून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसचा उल्लेख न करता नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्र आणि हरयाणा विधानसभा निवडणूक निकालात इंडिया आघाडीची मानहानीकारक हार झाली. त्यानंतर आता विरोधी पक्षातील नेत्यांकडूनच इंडिया आघाडीच्या नेतृत्वाबद्दल नाराजी सूर उमटण्यास सुरूवात झाली आहे. ममता बॅनर्जी यांनी याबद्दल मोठे विधान केले असून, मी इंडिया आघाडीचे नेतृत्व करायला तयार आहे, असे त्या म्हणाल्या. ममता बॅनर्जींचं विधान काँग्रेससाठी




मेसेज असल्याची चर्चा सुरू झाली आहे.न्यूज१८ बांगला वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीच्या कार्यपद्धतीवरून काँग्रेसबद्दल खंत व्यक्त केली.

ममता बॅनर्जी म्हणाल्या, मी इंडिया आघाडीची स्थापना केली होती. आता आघाडीचे नेतृत्व करणाऱ्यांवर ती चालवण्याची जबाबदारी आहे. ते जर हे व्यवस्थित करत नसतील, तर त्याला मी काय करू शकते. मी फक्त इतकंच म्हणेन की, सर्वांना सोबत घेऊन चालावं लागेल.

भाजपविरोधात एक मजबूत शक्ती म्हणून तुमची ओळख आहे, मग तुम्ही इंडिया आघाडीचे नेतृत्व का करत नाही आहात? असा प्रश्न ममता बॅनर्जी यांना विचारण्यात आला. मुख्यमंत्री बॅनर्जी म्हणाल्या, जर मला संधी मिळाली, तर मी इंडिया आघाडीचे नेतृत्व करेन. बंगालच्या बाहेर जाण्याची माझी इच्छा नाहीये, पण मी इथून इंडिया आघाडी चालवू शकते, असे उत्तर त्यांनी दिले.भाजपविरोधात विरोधकांना एकत्र आणण्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली. दोन डझनपेक्षा जास्त पक्ष आघाडीमध्ये आहेत. मात्र, अंतर्गत मतभेद आणि असमन्वयामुळे इंडिया आघाडीला दोन निवडणुकीत फटका बसला आहे. त्यामुळे आघाडीच्या नेतृत्वावर टीका होत आहे.

**तृणमूल काँग्रेसच्या खासदाराचा काँग्रेसला टोला**

ममता बॅनर्जी यांचे विधान तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांच्या विधानानंतर आले आहे. कल्याण बॅनर्जी म्हणाले आहेत की, काँग्रेस आणि इंडिया आघाडीने आपला अंहकार बाजूला ठेवायला हवा. ममता बॅनर्जी यांना विरोधी पक्षाच्या आघाडीच्या नेत्या म्हणून मान्यता द्यायला पाहिजे, असे कल्याण बॅनर्जी म्हणाले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले; मविआ आमदारांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

विधानसभेच्या नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीवेळी आज विधानभवनात नाट्यमय घडामोडी घडल्या. आमदारांच्या शपथविधीला सुरुवात होताच महाविकास आघाडीच्या आमदारांनी अचानक सभात्याग करण्याचा निर्णय घेतला. हे सरकार जनादेशाने आले नसून ईव्हीएम घोटाळ्याच्या जीवावर निवडून आलं आहे, असा हल्लाबोल करत मविआ आमदारांनी ही भूमिका घेतली. विरोधकांच्या या भूमिकेवर आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पलटवार करत खोचक शब्दांत समाचार घेतला आहे.



लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्षाला आणि त्यांच्या नेत्यांना त्यांनी काय वक्तव्य करायचं, हा त्यांचा अधिकार आहे. पण शपथ घेण्यासाठी उद्याचा शेवटचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल, तरच परवा सभागृहामध्ये ते कामकाजात भाग घेऊ शकतात. ही प्रक्रिया सगळ्यांना माहिती आहे. परंतु पहिल्याच दिवशी आपण काहीतरी वेगळं करतोय, आम्ही जरी संख्येने कमी असलो तरी आम्ही आमचं अस्तित्व दाखवण्याचा प्रयत्न करतोय, हा त्यांचा केविलवाणा प्रकार सुरू आहे, अशा शब्दांत अजित पवार यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला आहे.

महाविकास आघाडीकडून ईव्हीएम संदर्भात होणाऱ्या आरोपांना उत्तर देताना अजित पवार म्हणाले की, मी सुद्धा महाविकास आघाडीमध्ये काम केलेले आहे. या निवडणुकीत ईव्हीएमला दोष देण्यात काही अर्थ नाही. लोकसभेत ईव्हीएमने महाविकास आघाडीला ३१ जागा दिल्या. त्यावेळेस ईव्हीएम खूप चांगलं होतं. इकडं मात्र असा निकाल लागला त्यावेळेस ईव्हीएमला दोष द्यायला सुरुवात केली. त्याला काही अर्थ नाही. दरम्यान, आज विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेण्याचं टाळणाऱ्या मविआ आमदारांकडून उद्या काय भूमिका घेण्यात येते, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## कोण विरोधक? त्यांनी आम्हाला; अबू आझमींचे मविआतून बाहेर पडण्याचे संकेत?

**आमदारकीची शपथही घेतली**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

महाविकास आघाडीने आमदारांच्या शपथविधीवर बहिष्कार घातला आहे. आज त्यांच्यापैकी कुणीही शपथ घेणार नाही. मात्र महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने वेगळी भूमिका घेतली आहे. कोण विरोधक? ज्यांनी आम्हाला जागा वाटपात विश्वासात घेतलं नाही, कुठल्याही गोष्टींची चर्चा केली नाही ते का? असा प्रश्न अबू आझमी यांनी विचारला आहे. तसंच त्यांनी शपथही घेतली आहे. त्यामुळे एक प्रकारे अबू आझमी यांनी मविआतून बाहेर पडण्याचेच संकेत दिले आहेत.

**अबू आझमी महाविकास आघाडीतून बाहेर पडणार?**

सपाचे अबू आझमी हे शिवाजीनगर मानखुर्द विधानसभा आणि रईस शेख हे भिवंडी मतदारसंघातून निवडून आले आहेत. मात्र, आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अबू आझमी यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले. तर दुसरीकडे भिवंडीचे आमदार रईस शेख यांनी कालच सोशल मीडियावरुन ठाकरे गटाच्या हिंदुत्त्ववादी भूमिकेचा विरोध केला होता. त्यामुळे आता समाजवादी पक्षाचे दोन्ही आमदार मविआतून बाहेर पडतील, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## विधानसभेत महाविकास आघाडीच्या आमदारांचा शपथ घेण्यास नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर आज विधानसभेत महायुतीच्या आमदारांचा शपथविधी सोहळा होत आहे. दरम्यान, आदित्य ठाकरे, नाना पटोले, जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार आदी विरोधी पक्षातील आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतला आहे त्यामागचं कारणही विरोधकांनी सांगितलं आहे.

**नाना पटोले काय म्हणाले?**

महाराष्ट्रतल्या जनतेच्या ज्या जनभावना आहेत ते पाहून आम्ही शपथ घ्यायची नाही हा निर्णय आम्ही घेतला आहे. महाराष्ट्रातलं सरकार जनतेतलं नाही. जनतेतलं सरकार असतं तर आझाद मैदानावर जनतेचे कोट्यवधी रुपये खर्च केले नसते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत आणि सरकार शपथविधीसोहळा हा राज्याभिषेकासारखा होत असेल तर आम्ही जनतेच्या बाजूच मांडणार आहे. आम्ही शपथ न घेण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. आम्ही उद्धव ठाकरे, शरद पवार, राहुल गांधींशी चर्चा करून यापुढचा निर्णय घेऊ असं नाना पटोले म्हणाले आहेत.

**जितेंद्र आव्हाड काय म्हणाले?**

विधानसभेचे निकाल लागले आणि अनेक ठिकाणी अनेकांच्या मनात खदखद सुरु झाली. या निकालांवर महाराष्ट्राचा विश्वास





कसा बसेल हा प्रश्न आहेच. मारकडवाडीने भूमिका घेतली ती बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची. बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यायची असताना निवडणूक आयोग मधे आला. मला माझ्या गावात निवडणूक घ्यायची असेल तर पोलिसांचा काय संबंध? तुम्ही हे घ्यायचंच नाही असं का? गावातल्या लोकांच्या निर्णयावर वरवंटा फिरवण्याचं काम लोकशाहीने निवडून आलेले लोक करत असतील तर हे लोकशाहीने निवडूनच आलेले नाहीत असा थेट घणाघात जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

**काय म्हणाले आदित्य ठाकरे?**

आपल्या सगळ्यांना माहीत आहे की आमदारकीची शपथ आम्ही निषेध म्हणून घेतलेली नाही. जल्लोष, उत्साहाचं वातावरण असतं. त्यामुळे मनात हाच प्रश्न पडतो की जनतेने दिलेला कौल आहे की नवडणूक आयोगने दिलेला कौल आहे? असा प्रश्न आदित्य ठाकरेंनी विचारला आहे. एवढ्या बहुमताने सरकार निवडून आलं आहे. पण कुठलाही जल्लोष नाही. मध्यंतरीच्या काळात काँग्रेस किंवा आम्ही सगळे असू आम्ही निवडणूक आयोगाकडे आमचे प्रश्न उपस्थित केले आहेत. ते प्रश्न जनतेच्या मनातले प्रश्न आहेत.

आम्ही राजकीय पक्ष म्हणून उपस्थित करतो तसंच मारकडवाडी नावाचं गाव आहे. तिथेही जनतेने मॉकपॉल मागितला होता. जनतेच्या मनातल्या शंका आहेत त्यासाठी हे तिथल्या लोकांनी मागितलं होतं. बॅलेट पेपरवर किती जागा कोण जिंकतं आणि त्याविरोधात ईव्हीएमवर कोण कसं जिंकतं हे आम्ही दाखवून दिलं आहे. मात्र, त्या गावात कर्फ्यू लावण्यात आला. २० जणांना अटक करण्यात आली. आम्ही हरलेले नाहीत. तरीही आमच्या मनात ईव्हीएमबाबत शंका आहे. आम्ही जनतेचा मान राखून शपथ घेणार नाही. २०१४ पासून लोकशाही मारण्याचं काम सुरु आहे असं आदित्य ठाकरे म्हणाले आहेत.

## शरद पवार व राहुल गांधी मारकडवाडीला जाणार

### ईव्हीएमविरोधात लाँग मार्चची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मारकडवाडी**

माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावात मतपत्रिकेद्वारे चाचणी मतदान घेण्याच्या निर्णयाबद्दल माळशिरसचे राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यासह इतरही १०० हून अधिक ग्रामस्थांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दुसऱ्या बाजूला, विरोधी पक्ष ईव्हीएमविरोधातील आंदोलन आणखी तीव्र करण्याची तयारी करत आहेत. काँग्रेसने ईव्हीएमविरोधात लाँग मार्च काढण्याची योजना आखली




आहे. विशेष म्हणजे या लाँग मार्चची सुरुवात मारकडवाडीतून होणार असल्याची चर्चा होती. यावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार जितेंद्र आव्हाड व आमदार उत्तम जानकर यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. शुक्रवारी (६ डिसेंबर) जानकरांनी प्रसारमाध्यमांसमोर यावर भाष्य केलं. पाठोपाठ जितेंद्र आव्हाडांनी देखील एक्सवर पोस्ट करून याबाबतची माहिती दिली आहे.

आव्हाड यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की ईव्हीएमच्या विरोधात बॅलेट पेपरवरील मतदान प्रक्रियेसाठी पुढाकार घेणाऱ्या मारकडवाडीतील १७ जणांसह अन्य १०० ते २०० ग्रामस्थांच्या विरोधात पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांची ही कृती राज्यभरात खदखदत असणाऱ्या ईव्हीएमविरोधी असंतोषाला अजूनच चालना देणारा ठेल यात वाद नाही. परिणामी संपूर्ण राज्यात 'मारकडवाडी पॅटर्न' राबवायला सुरुवात होईल, याची मला खात्री आहे. येत्या रविवारी (८ डिसेंबर) शरद पवार मारकडवाडीला भेट देणार आहेत. राहुल गांधी देखील ईव्हीएमविरोधात लाँगमार्च मारकडवाडी येथूनच काढणार आहेत.

## राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्षपदी उद्या अर्ज भरण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

राज्यातील २८८ आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर सोमवारी विधानसभेच्या नव्या अध्यक्षाची निवड होणार आहे. या पदावर पुन्हा एकदा भाजपच्या राहुल नार्वेकर यांची वर्णी लागणार आहे. राहुल नार्वेकर यांनी गेल्या अडीच वर्षांमध्ये मोठ्या कौशल्याने विधानसभेचे कामकाज हाताळले होते. ठाकरे गट आणि शिंदे गट यांच्यातील शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या वादात राहुल नार्वेकर यांनी निर्णायक भूमिका बजावली होती. त्यामुळे आता राहुल नार्वेकर हेच विधानसभा अध्यक्ष होतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.



राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरील निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. राहुल नार्वेकर हे रविवारी दुपारी १२च्या सुमारास विधानसभा अध्यक्षपदासाठी आपला अर्ज दाखल करतील. यंदा महायुतीकडे प्रचंड संख्याबळ असल्याने राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदावरची निवड ही केवळ औपचारिकता मानली जात आहे.

## भाजप राज ठाकरेंच्या बिनशर्त पाठिंब्याची परतफेड करणार मनसेला विधानपरिषद किंवा महामंडळ मिळणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवली होती. मात्र, त्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत मनसेने महायुतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वासाठी बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्याचं गिफ्ट राज ठाकरेंच्या मनसेला मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मनसेला विधानपरिषद किंवा महामंडळ किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या पदाच्या रुपाने रिटर्न गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे.

लोकसभेत मनसेनं महायुतीला आणि भाजपला दिलेल्या बिनशर्त पाठिंबा दिला, त्याचं रिटर्न गिफ्ट देखील यावेळी मनसेला



मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानपरिषद किंवा महामंडळ किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचं एखाद पद मनसेला देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याची चर्चा सुरू आहे. अद्याप देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची भेट झालेली नाही. भेट झाल्यानंतर सर्व माहिती समोर येईल. देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची मैत्री काही दिवसांपासून नव्हे तर काही वर्षांपासून आहे. मागच्या काही निवडणुकीमध्ये पाहिलं तर फडणवीस यांनी भेटी-गाठी घेतल्यानंतर, चर्चा केल्यानंतर आणि सांगितल्यानंतर राज ठाकरे यांनी आपली भूमिका महायुतीच्या बाजूने किंवा भाजपच्या बाजूने केलेली होती. दोघांची मैत्री चांगली आहे आता या दोन पक्षांमध्ये मैत्री होते, का हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे. पण ज्याप्रमाणे देवेंद्र फडणवीस म्हणत आहेत आणि विचार करून तसंच मनसे देखील याबाबत विचार करून आपली भूमिका लवकरच मांडण्याची शक्यता आहे.

## विधानसभा निवडणुकीतही राज्यात घराणेशाही कायम २८८ पैकी २३७ उमेदवार वारसाहक्काचेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पुणे**

राज्यातील राजकारणात घराणेशाहीचे वर्चस्व असल्याचा आरोप कायमच होत आला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघाचा अभ्यास करून सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी याही निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांमध्ये घराणेशाही कायमच असल्याचे सिद्ध केले आहे.

राज्यात २८८ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी तब्बल २३७ मतदारसंघांतील उमेदवार कोणत्या ना कोणत्या तरी घराण्याचे वारस (ज्यांची पूर्वपीठिका आमदार, खासदार असल्याची आहे अशी घराणी) होते. भाजपने १४९ जागा लढवल्या, त्यातील ४९ उमेदवार वारसाहक्काने आलेले होते. काँग्रेसने १०१ जागा लढवल्या,



त्यातील ४२ उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने ८६ जागा लढवल्या, त्यातील ३९ उमेदवार, अजित पवार गटाच्या जागा होत्या ५९ व त्यातील २६ उमेदवार हे घराणेशाहीतील होते. उद्धवसेनेने ९५ लढवल्या, १९ आल्या, शिंदेसेनेने ८१ लढवल्या, १९ आल्या अशी ही आकडेवारी आहे.

खासदार नीलेश लंके यांचे. प्रस्थापितांच्या विरोधात मतदारांना त्यांनी लोकसभेला खासदार केले, मात्र त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत लगेचच त्यांनी आपल्या पत्नीला विधानसभेची उमेदवारी मिळवून दिली. वर्धा येथील खासदार अमर काळे यांनीही तेच केले आहे. घराणेशाहीतही संघर्ष असून, काका पुतण्यांमध्ये तर तो आहेच, पण वडील- मुलगी (अहेरी), सख्खे भाऊ (सावनेर), पती-पत्नी (कन्नड) असेही एकमेकांच्या विरोधात उभे असल्याचे दिसते.

## संपादकीय ......

# मुलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक

*एकीकडे, आधुनिक दळणवळण माध्यमे आणि वाहतुकीच्या साधनांमुळे आजचे डिजिटल जग जागतिक खेड्यात रूपांतरित झाले आहे. आज सीसीटीव्ही कॅमेर्यांद्वारे सर्व भूभागांवर 'नजर' ठेवली जात असून अनेक गुन्हेगारांचा शोध घेण्यात तंत्रज्ञान प्रभावी ठरत आहे. असे असताना देशभरातून दरवर्षी ८० हजारांहून अधिक मुले बेपत्ता होतात, असे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोची आकडेवारी दर्शवत असेल, तर ती निश्चितच चिंताजनक आणि धक्कादायक बाब आहे.*

*मानवी तस्करी हे आधुनिक जगातील कटू वास्तवही आहे आणि बहुविकसित तपास यंत्रणांपुढील जटिल आव्हानही आहे. विशेषतः बालकांची तस्करी ही जागतिक पटलावरची एक मोठी समस्या बनली आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) या तस्करीचे संघटित नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी अलीकडेच देशातील सहा राज्यांमध्ये २२ ठिकाणी छापे टाकले. एनआयएने हे प्रकरण स्थानिक पोलिसांकडून ताब्यात घेतले आहे. आज एकीकडे डिजिटल तंत्रज्ञानाच्या व्याप्तीमुळे जग ग्लोबल व्हिलेजचे रूप धारण करत आहे. दळणवळणाची साधने अत्याधुनिक असल्याने एकमेकांशी संपर्क करणे, साधणे सहज सोपे झाले आहे. दुसरीकडे याच जगातील भारतातून रोज हजारोंच्या संख्येने मुले बेपत्ता होत आहेत. विशेष म्हणजे, पापणी लवण्याच्या आत एखादी माहिती एका टोकाकडून दुसर्या टोकाकडे पोहोचत असताना आणि सर्व गोष्टी कॅमेर्याच्या कक्षेत आलेल्या असताना दरवर्षी देशभरातील सुमारे ८० हजारांहून अधिक मुले बेपत्ता होण्याचा अर्थ काय काढायचा? मुलांच्या 'नॉट रिचेबल'चे वाढते प्रमाण हे चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे.*

*राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या म्हणजेच 'एनसीआरबी'च्या डिसेंबर २०२३ च्या आकडेवारीनुसार २०२२ मध्ये ८३ हजार ३५० मुले गायब झाली होती. यामध्ये २० हजार ३८० मुले आणि ६२ हजार ९४६ मुली आणि २४ तृतीयपंथीयांचा समावेश आहे. एकीकडे मुलांच्या सुरक्षेसाठी पालकवर्ग आणि पोलीस पूर्वीच्या तुलनेत अधिक सजगता बाळगत असताना आणि अत्याधुनिक उपकरणांच्या बळावर सुरक्षा व्यवस्था चौकस केली जात असताना लहान मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण मात्र कमी होताना दिसत नाही, हे खरे पाहता आपल्या एकूण तपास यंत्रणांचे घोर अपयश म्हणायला हवे. विशेष म्हणजे, 'एनसीआरबी'ची आकडेवारी अपूर्ण स्वरूपाची आहे. प्रत्यक्षात मुले बेपत्ता होण्याचे प्रमाण त्याहून अधिक आहे. काही स्वयंसेवी संस्थांच्या मते, दरवर्षी ८० ते ८५ हजार नाही, तर अनेक लाख मुले बेपत्ता होत आहेत. म्हणजेच देशात दर मिनिटाला किमान दोन मुले गायब होताहेत. घरापासून निघून जाणारी मुले शेवटी असतात कोठे? अनेक महिने शोध घेऊनही त्यांचा पत्ता का लागत नाही, हा प्रश्न चिंताजनक आहे. घरातून निघून गेलेली मुले परत येण्याची शक्यता ही असून नसल्यासारखीच असते. काही बेपत्ता मुले सापडतात आणि त्यांच्यासंदर्भात थोडीफार माहिती गोळा करू शकतो. त्यांना कोणी आमिष दाखवून कसे पळवून नेले, हे देखील समजते; पण जी मुले परत आलीच नाहीत, त्यांच्यासंदर्भात त्यांच्या पालकांना काहीच ठाऊक नसते. पोलिसांकडे पूर्वीच्या तुलनेत आज चौकशीसाठी आणि तपासासाठी चांगली साधने आहेत, तरीही बेपत्ता मुले अंदाज बांधल्याप्रमाणे घरी परतताना दिसत नाहीत. शेवटी ही मुले जातात कोठे आणि त्यांचे काय होते, याचा शोध कोणालाच लागत नाही. स्वयंसेवी संस्था किंवा बालहक्कांसाठी कार्यरत असणार्या कार्यकर्त्यांच्या मते शेकडो बेपत्ता मुलांची तर पोलिसांकडे नोंदच केली जात नाही. पालकांनी तक्रार केली, तरी पोलिस ठाण्यात त्यांना थारा दिला जात नाही. याबाबत निठारी हत्याकांडाचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. या बालहत्याकांडात बळी गेलेल्या मुलांच्या पालकांनी पोलिसांकडे ती बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती; परंतु पोलिसांनी त्याकडे लक्ष दिले नव्हते. माजी सैनिक शहाजी जगताप यांची सांगलीत बीएससीच्या तृतीय वर्षांत शिकणारी मुलगी बेपत्ता झाली होती. याबाबत तक्रार करूनही पोलिसांना तिचा शोध घेता आला नाही. वास्तविक जी मुले घरी परतत नाहीत, ती गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकतात. बेपत्ता मुलींवर तर बलात्कारासारख्या भयंकर घटना घडतात. अनेकींना शरीरविक्रीच्या विळख्यात ढकलले जाते. अनेकींचा खूनही होतो, तर शेकडो मुलांच्या अवयवयांची तस्करीही होत असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होते. काही संघटना मुलांचे अवयव गुपचूप काढून त्याची विक्री करण्याचा अमानूष प्रकार करतात.*

*दुसरीकडे, अल्पवयीन मुले ही दहशतवाद्यांच्या हाती लागणारे सोपे हत्यार असल्याचेही गेल्या काही वर्षांत स्पष्ट झाले आहे. काही वर्षांपूर्वी संयुक्त राष्ट्राच्या एका अहवालानुसार, आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील सत्ताविरोधी सशस्त्र संघटनांनी मुलांना आपल्या संघर्षात ओढले होते. मुले बेपत्ता होण्याच्या प्रकरणांत सरकारकडून, स्वयंसेवी संस्थांकडून युद्धपातळीवर प्रयत्न करूनही फारसे यश मिळताना दिसत नसल्यामुळे आता प्रयत्नांची दिशा बदलावी लागणार आहे. 'ऑपरेशन मुस्कान' ही बेपत्ता मुलांना शोधून त्यांच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यासाठी राबविली जाणारी एक प्रकारची चळवळ किंवा मोहीम आहे. २०२२ मध्ये मुंबई पोलिसांनी या मोहिमेंतर्गत एका महिन्यात १९० मुलांना शोधून काढले होते. अशा प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घ्यायला हवा. पोलीस आणि स्वयंसेवी संस्थांच्या आकलनानुसार मुले-मुली बेपत्ता होण्यामागे काही कारणे दिसून येतात.*

# विकासाचे ध्यासपर्व




राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्यासोबत दोन उपमुख्यमंत्री यांचा झालेला शपथविधी चाहत्यांनी डोळे भरून आणि विरोधकांनी डोळे बंद करून पाहिला. ऐतिहासिक असे यश मिळाल्यानंतर तितकाच भव्य-दिव्य शपथविधी सोहळा व्हावा, हे सहाजिकच आहे. देशभरातले २० मुख्यमंत्री, पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्री आणि असंख्य सेलिब्रिटीज या सोहळ्याला उपस्थित होते. तूर्त तीन लोकांचे मंत्रिमंडळ कामाला लागलेले आहे.

एकपेक्षा जास्त आयटम असतील, तर त्याला 'कॉम्बो पॅक' म्हटले जाते. उदाहरणार्थ तुम्ही डॉमिनोजचा पिझ्झा मागवला, तर त्याबरोबर थम्सअपची छोटी बाटली फ्री येते. या 'कॉम्बो पॅक'ची वेगळी जाहिरात केलेली असते आणि त्याच्या किमतीही वेगळ्या असतात. हे दोन्ही पदार्थ वेगवेगळे मागवले, तर त्याची किंमत जास्त पडते आणि हे 'कॉम्बो पॅक' एकत्र मागवले, तर ते स्वस्तात पडते. आजकाल 'कॉम्बो पॅक'चा जमाना आहे. राज्याला सरकारसुद्धा 'कॉम्बो पॅक' मिळालेले आहे. मुख्यमंत्रिपदाचा पूर्वीची पाच वर्षे अधिक सकाळच्या शपथविधीचे ७२ तास अनुभव असलेले व्यक्तिमत्त्व राज्याला मुख्यमंत्री म्हणून मिळालेले आहेत. या चेहर्यावरील कर्तव्य कठोर भाव आणि त्याला साजेशी देहबोली असणारे माजी मुख्यमंत्री हे विद्यमान सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झालेले आहेत. घरातील सर्वांचा विरोध पत्करून गुलाबी जॅकेट घालून राज्यभर गुलाबी वादळ आणणारे दुसरे एक नेते उपमुख्यमंत्री झाले आहेत. अशाप्रकारचे हे बहुविधरंगी आणि कर्तुत्ववान असे 'कॉम्बो पॅक' सत्तेमध्ये आले आहे. विकासाचा ध्यास घेतलेले असे तीन नेते मन लावून आणि एकमेकांशी चांगला संपर्क ठेवून काम करतील, तर राज्य मात्र प्रगतिपथावर निघाले आहे, असे समजायला हरकत नाही.


या तीन व्यक्ती सरकार चालवणार आहेत, असे एकदाचे ठरल्यानंतर पुढील टप्पा हा मंत्रिपदे मिळण्याचा आहे. तीनही पक्षांतील प्रमुख नेते त्यासाठी भेटीगाठी करत आहेत. प्रत्येकाला शक्यतो कॅबिनेट मंत्रिपद पाहिजे आहे आणि अगदीच ते न मिळाले, तर किमान राज्यमंत्रिपद तरी मिळावे असा प्रयत्न आहे. एकदाचे मंत्रिपद मिळाले की, नंतर खाते वाटप असते. खाते वाटपामध्येही आपल्याला चांगले आणि कर्तुत्व दाखवण्यासारखे खाते मिळावे असा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. एकदा का खातेवाटप होऊन मंत्रिमंडळ पूर्ण झाले की, मग आधीच्या 'कॉम्बो पॅक'चे स्वरूप बदलून त्याचे रूपांतर पंचरंगी थाळीमध्ये होणार आहे. थाळीमधील जेवण हे अनलिमिटेड असते आणि त्यामध्ये विविध रसांचा आणि चवींचा अंतर्भाव असतो. जनतेचा त्याकडे साहजिकच ओढा असतो. आपल्या नेत्याला मंत्रिपद मिळाले की, लगेच त्यांचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते सक्रिय होत असतात. साहेबांच्या माध्यमातून कामे मिळवणे आणि ती पूर्ण करून आपली प्रगती साधणे हा कार्यकर्त्यांचा उद्देश असतो. अर्थात, यात काही चूकही नाही. कारण, ज्याला आपण साथ दिली तो विजयी झाला, तर आपल्याला काहीतरी फायदा होईल, हे प्रत्येकाने गृहीत धरलेले असते. ज्या लोकांनी गेले तीन महिने दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून आपल्या नेत्याचा प्रचार केला आहे, त्यांना 'अच्छे दिन' आले आहेत, हे आपल्या लक्षात येईल.




## दररोज भरभर चालण्याचे असे होतात फायदे

दि.७विदर्भ प्रजासत्ताक ३ आरोग्य

सहज कुठेही आणि कधीही करता येण्याजोगा चल पद्धतीचा चांगला व्यायाम कोणता, असं जर आरोग्यतज्ज्ञांना विचारलं तर 'भरभर चालणं' हे उत्तर नक्की एकमुखाने येईल. भरभर याचा अर्थ चालताना व्यक्तीच्या नाडीच्या ठोक्याची गती वाढणं. प्रत्येक व्यक्तीच्या तंदुरुस्तीच्या स्थितीवर हा वेग अवलंबून असतो. जी व्यक्ती नियमाने व्यायाम करत असेल त्या व्यक्तीचे शांत स्थितीत नाडीचे ठोके संथ वेगाने पडत असतात. याउलट बरेच दिवस कोणताही व्यायाम न केलेल्या व्यक्तीच्या नाडीचे ठोके अगदी माफक श्रमांनीदेखील भरभर पडू लागतात. चालताना अगदी पावलांपासून खांद्यापर्यंतचे अनेक स्नायू कार्यान्वित होतात.



प्रत्येक स्नायूच्या आकुंचनाबरोबर स्नायूत असणारं रक्त नीलांमधून हृदयाकडे पाठवलं जातं. त्यामुळे हृदयाकडे येणार्या रक्ताचं प्रमाण बरंच वाढू लागतं. याचा परिणाम नाडीची व श्वसनाची गती वाढण्याकडे होतो. अशी वाढलेली गती हृदयाच्या स्नायूंना व्यायाम घडवते. असा व्यायाम दररोज अर्धा तास आठवड्यातले पाच दिवस केला तर रुधिराभिसरण आणि श्वसन या दोन्ही संस्था अधिकाधिक कार्यक्षम होऊ शकतात, असं तज्ज्ञ सुचवतात.

दुसरीकडे अजिबात दमछाक न होता पण अधिक काळ काम करत राहता यावं, या उद्देशाने जे व्यायाम करता येतात, त्यात व्यायाम करताना नाडीची गती फारशी वाढण्याची आवश्यकता नसते. उलट ते संथ गतीने केले तरच ते दीर्घकाळ करता येतात. संथ चालताना स्नायूंवर, सांध्यांवर, पाठीच्या कण्यावर, श्वसनावर ताण येत नाही. स्नायूंना आपलं काम करण्यास लागणारी ऊर्जा प्राणवायूचा वापर करून मिळवता येते. चयापचयावरही ताण येत नाही. म्हणूनच असं सांगितलं जातं की, संथ गतीने आठवड्याला आठ ते दहा तास चालणं हा वजन कमी करण्यासाठी उत्तम उपाय ठरू शकतो.

# गव्हाच्या अधिक उत्पादनांसाठी खत व्यवस्थापन समजून घ्या

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रात घेतल्या जाणाऱ्या अन्नधान्य पिकांपैकी गहू हे रब्बी (थहशरीं ऊी) हंगामातील एक महत्वाचे पीक आहे. खरीप हंगामात पाऊस लांबल्यामुळे खरीपाची पिके काढणीस वेळ होतो. तसेच काही क्षेत्रावर ऊसतोडणीनंतर, कापसाचे पीक काढल्यानंतर किंवा मका काढणीनंतर पिकांच्या काढणीस उशीर झाल्याने शेतक-यांना गव्हाची उशिरा पेरणी करावी लागते. गहू पिकासाठी खत व्यवस्थापन कसे करावे, हे सविस्तर जाणून घेऊयात....

**खते व्यवस्थापन (प्रति एकर अन्नद्रव्ये मात्रा)**-गव्हाच्या पिकासाठी एकरी ४ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत दयावे. शेणखत/ कंपोस्ट उपलब्ध साल्यास गांडूळ खत/ अखाद्य पेंड/कोंबडी खत किंवा इतर सेंद्रिय खतांचा वापर करावा,

महाराष्ट्रातील बागायती क्षेत्रात गव्हाचे अधिक उत्पादन मिळविण्या साठी गहु पिकास पेरणीनंतर ५५ आणि ७० दिवसानंतर पिकावर २०० ग्रॅम १९:१९:१९ या विद्राव्य खताची १० लि. पाण्यात मिसळून दोन फवारण्या कराव्या.




जस्ताची कमतरता असलेल्या जमिनीत गहू पिकात एकरी ८ किलो झिंक सल्फेट शेणखतात एक आठवडा मुरवून (११० प्रमाणात) पेरणीच्या वेळेस जमिनीतून द्यावे. लोहाची कमतरता असलेल्या जमिनीत गहू पिकास एकरी ८ किलो फेरस सल्फेट (हिराकस) आठवडाभर शेणखतात मुरवुन (१:१० प्रमाणात) पेरणीच्या वेळेस जमिनीतून द्यावे..

**- डॉ. योगेश पाटील, डॉ. भानुदास गमे आणि प्रा. भालचंद्र म्हस्के**

जिल्हा विस्तार केंद्र, कृषि संशोधन केंद्र, निफाड- जिल्हा- नाशिक


# ऑनलाईन नोकरी शोधताय 'या' गोष्टी फॉलो करा

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

इंटरनेटमुळे नोकरी शोधणे पूर्वीसारखे अवघड राहिलेले नाही. अनेक जॉब पोर्टल्स, साईट्सद्वारे तुम्ही नोकरी शोधू शकता. अशाप्रकारे नोकरी शोधताना तुम्हाला ऑनलाईन अर्ज करावा लागतो. असा अर्ज करताना अनेकजण चुका करतात. या चुकांमुळे नोकरी मिळण्यात अडचणी येतात.

अनेक जण अर्ज करताना स्वत: विषयीची माहिती तपशिलाने देत नाहीत. म्हणजे आपलं शिक्षण, तसेच या क्षेत्रातील नोकरीचा पूर्वानुभव याबाबत फारच त्रोटक माहिती दिली जाते. तसेच सध्या काम करत असलेल्या आणि पूर्वी काम केलेल्या कंपन्यांमध्ये कोणत्या विषयात स्पेशलायझेशन होते का, यांसारखी माहिती देणे आवश्यक आहे.इंटरनेटचा विस्तार अवाढव्य असल्यामुळे कंपन्यांकडे दररोज हजारो ऑनलाईन अर्ज येत असतात. येणारा प्रत्येक अर्ज वाचणे आणि त्यातून योग्य उमेदवारांना इंटरव्ह्यूसाठी बोलावणे हे मोठे अवघड काम असते. तुमचा अर्ज अर्धवट असेल तर त्या कंपनीतील एचआर विभागातील संबंधित व्यक्ती अशा अर्जाकडे दुर्लक्ष करतात.

जॉब बोर्डवर तुमचे नाव रजिस्टर केल्यानंतर रिझ्युम अपलोड केला जातो. त्यानंतर त्याला कव्हर लेटर जोडावे. त्यात कंपनीला आवश्यक असणारी सर्व ती माहिती तपशिलाने दिली पाहिजे. अर्ज करणारा उमेदवार हा स्वतःची एखादी माहिती हेतुपूर्वक लपवत आहे, असा समज निर्माण होऊ देऊ नका. अनेक जण ऑनलाईन



अर्ज पाठवताना स्वतःचा संपर्क क्रमांक त्यात लिहित नाहीत. ही सर्वात मोठी चूक ठरते. त्यामुळे मोबाईल आणि लॅन्डलाईन असे दोन्ही क्रमांक ठळक अक्षरात अर्जामध्ये नोंदवलेले असले पाहिजेत.एखाद्या कंपनीने त्यांच्या अर्जाद्वारे उमेदवारांची माहिती मागवली असेल, तर तो अर्ज संपूर्णपणे भरा. त्यातला कोणताही कॉलम मोकळा सोडू नका..

अर्ज करताना सध्या मिळत असलेला पगार व अपेक्षित असलेला पगार याचा स्पष्ट उल्लेख करा. सध्या मिळत असलेला पगार वाढवून लिहू नका. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे, तुम्ही न केलेल्या किंवा तुम्हाला न करता येणाऱ्या गोष्टीचा अर्जात उल्लेख करू नका. स्वतः विषयी खरी माहिती द्या.

काही कंपन्या अर्ज मागवताना 'उमेदवारांनी दूरध्वनी क्रमांकाचा उल्लेख करू नये', 'मेल पुन्हा पुन्हा पाठवू नये' अशा स्पष्ट सूचना देतात. या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

जो सर्वात प्रथम अर्ज करेल, त्यालाच नोकरी मिळेल अशी अट कंपन्यांनी घातलेली नसते. त्यामुळे घाईघाईत अर्ज करू नका. अर्ज करण्यापूर्वी जॉब बोर्ड, रिझ्युम आणि कव्हर लेटरमधील डिटेल्स पुन्हा एकदा तपासा.अर्जात काही जण स्वतःबद्दल वेगळे मत निर्माण व्हावे म्हणून शैलीदार भाषेचा उपयोग करतात. ज्या कंपनीला नोकरभरती करायची असते, त्या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी असल्या युक्त्यांकडे लक्ष देत नसतात. ते फक्त उमेदवाराचा सिव्ही बघत असतात. अर्ज केल्यानंतर आठ ते दहा दिवसानंतर तुम्हाला त्या कंपनीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही, तर तुम्ही स्वतः त्या कंपनीकडे मेल पाठवून आपल्या अर्जाचे काय झाले, याची चौकशी केली पाहिजे; मात्र असे करताना दिवसात तीन-चार मेल, चार-पाच फोन अशा आततायी पद्धतीने फॉलोअप ठेवू नका.

# शेतकऱ्यांना विनातारण दोन लाखांपर्यंतचे कर्ज, आरबीआयकडून कर्ज मर्यादेत ४० हजारांची वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मुंबई** - भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) विनातारण कृषी कर्ज मर्यादेत एक लाख ६० हजार रुपयांवरून दोन लाखांपर्यंत वाढ केली आहे. या मर्यादेत २०१९ नंतर प्रथमच बदल करण्यात आला आहे. दरम्यान, आरबीआयने सलग अकराव्यांदा रेपो दर ६.५ टक्के कायम ठेवला असल्याने कर्ज व्याज दरातील कपात लांबणीवर पडली आहे. मात्र, रोख राखीव प्रमाण (सीआरआर) ४.५ टक्क्यांवरून ४ टक्क्यांवर करण्याचा निर्णय घेतल्याने बँकांना कर्ज वितरणासाठी अतिरिक्त १.१६ लाख कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत.आरबीआयच्या पत धोरण समितीच्या बैठकीत शुक्रवारी कर्ज मर्यादा वाढीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे लघू आणि अल्पभूधारक शेतकर्यांना फायदा होणार आहे. कृषी उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि महागाईमुळे आरबीआयने कर्जात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. चांगल्या पर्जन्यमानामुळे ग्रामीण भागातील मागणीत वाढ झाली आहे. ऑक्टोबरअखेरीस महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेतील रोजगारात साडेसात टक्क्यांनी घट झाली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत



धोरण समितीच्या (एमपीसी) बैठकीत हा निर्णय घेतला. गव्हर्नर डॉ. दास, डॉ. राजीव रंजन, डॉ. मायकल पात्रा, सौगत भट्टाचार्य यांनी रेपो दर कायम ठेवण्याच्या बाजूने मतदान केले; तर डॉ. नागेश कुमार आणि प्रा. राम सिंग यांनी रेपो दरात पाव टक्के कपात करण्याची मागणी केली होती. महागाई निर्देशांकातील वाढीमुळे समितीतील बहुतांश सदस्यांनी रेपो दर कायम ठेवण्याच्या बाजूने आपला कौल दिला. रोख राखीव प्रमाणात दोन टप्प्यांमध्ये मिळून अर्धा टक्का कपात करण्यात येणार आहे. सध्या सीआरआरचा दर ४.५ टक्के आहे. म्हणजेच बँकांना त्यांच्या प्रत्येक शंभर रुपयांपैकी साडेचार रुपये आरबीआयकडे ठेवावे लागतात. आता सीआरआर १४ डिसेंबरपासून ४.२५ आणि २८ डिसेंबरपासून ४ टक्के होणार आहे. याचाच अर्थ २८ डिसेंबर पासून सीआरआरनुसार बँकांना ४ टक्केच रक्कम आरबीआयकडे ठेवावी लागेल. डिसेंबरअखेरपर्यंत सीआरआर मध्ये अर्धा टक्का कपात झाल्याने रक्कम बँकांना कर्ज वितरणासाठी उपलब्ध होणार आहे.

### महागाईने रोखली रेपो दरातील कपात

आरबीआयने मे २०२२ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीत रेपो दरात अडीच टक्क्यांनी वाढ केली आहे. सलग अकराव्यांदा रेपो दर स्थिर ठेवण्यात आले आहे. भाजीपाला आणि खाद्यान्नाच्या महागाईमुळे शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांची क्रयशक्ती कमी झाली आहे. महागाई आणि अर्थगतीमध्ये संतुलन राखण्यासाठी रेपो दर ६.५ टक्के स्थिर ठेवत असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. त्यामुळे कर्ज व्याज दरातील कपातही लांबणीवर पडली आहे. पत धोरण समितीची पुढील बैठक ५ ते ७ फेब्रुवारी २०२५ रोजी होईल.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ७ डिसेंबर २०२४

शहर/ग्रामिण


### तब्बल दीड लाखांची वृद्धीडॉ.आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा योजनेच्या अनुदानात वाढ

## विहिरीसाठी अर्ज केला का?

# अडीच लाखांऐवजी मिळणार चार लाख

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** कृषी विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकऱ्यांकरिता राबविण्यात येते. या योजनेंतर्गत विविध लाभाच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. विहिरीच्या बांधकामासाठी यापूर्वी २ लाख ५० हजार रुपये दिले जात होते. आता त्यात १ लाख ५० हजार रुपयांची वाढ करण्यात आली असून, थेट ४ लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व विरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. रोजगार हमी योजनेंतर्गत खोदल्या जाणाऱ्या विहिरींच्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे.

त्याच धर्तीवर आता सदर योजनेंतर्गत विहिरीसह विविध उपघटकांच्या लाभाच्या अनुदानात ३ डिसेंबर २०२४च्या कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०२४-२५ या वर्षीपासून वाढ करण्यात आली आहे.

सिंचन विहिरीकरिता ४ लाख, जुनी विहीर दुरुस्तीकरिता १ लाख रुपये, इनवेल बोअरकरिता ४० हजार, विद्युत जोडणीकरिता २० हजार, पंपसंचकरिता खर्चाच्या २० टक्के किंवा ४० हजार रुपये, सौर कृषिपंपाकरिता खर्चाच्या ९० टक्के किंवा ३० हजार रुपयांपर्यंत अनुदान, तुषार सूक्ष्म सिंचनाकरिता १५ टक्के किंवा रुपये. ४७ हजार रुपयांच्यामर्यादेत, ठिबक सिंचन संचाकरिता १५ टक्के किंवा ९७ हजार रुपयांच्या मर्यादेत पुरक अनुदान दिले जाणार आहे. शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण खर्चाच्या ९० टक्के किंवा २० हजार रुपयांपर्यंत, एचडीपीई / पीव्हीसी पाइप खर्चाच्या १०० टक्के किंवा ५० हजार रुपयांपर्यंत, बैलचलित / ट्रॅक्टरचलित औजारे- यंत्रसामग्री खरेदीकरिता ५० हजार रुपये व परसबाग बियाणे / कलमे रोपे / खते / औषधांकरिता ५ हजार रुपये अनुदान मिळणार आहे.

योजनेच्या माहितीकरिता पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीन करण्यात आले आहे.



### लाभासाठी कोठे करावा अर्ज ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या लाभासाठी अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांनी 'महाडीबीटी' पोर्टलच्या संकेतस्थळावर अर्ज करावा. लाभार्थ्यांची निवड पोर्टलवर लॉटरीद्वारे करण्यात येते. अनुदान अदा करण्याची सर्व प्रक्रिया ऑनलाइनच होते.

### योजनेच्या लाभासाठी पात्रता काय?

योजनेत लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती, नवबौध्द व आदिवासी शेतकरी असावा. त्याच्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

जमीनधारणेचा ७/१२ असावा. लाभार्थ्याकडे ॡ स्वतःचे आधारकार्ड, स्वतःचे बँक खाते असावे. सदर बैंक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.किमान ०.४० हेक्टर व कमाल ६.०० हेक्टर शेतजमीन असलेला शेतकरी या योजनेस पात्र आहे.

# घाई गडबडीत रेल्वेगाडीमध्ये बॅग विसरली तर काळजी करू नका !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती** रेल्वेने प्रवास करताना घाईगडबडीत अनेकदा जवळील साहित्य, बैंग विसरून राहण्याचे प्रकार घडतात. विसरलेली वस्तु, साहित्य, बैंग कसे परत मिळणार, म्हणून अनेकांना काळजी वाटते. परंतु अशावेळी घाबरून न जाता आरपीएफ पोलिस किंवा जीआरपी पोलिस यांच्याकडे माहिती देता येते. शिवाय रेल्वेच्या टोल फ्री क्रमांक १३९ वर संपर्क साधून आपली तक्रार नोंदविता येते.

रेल्वेचा प्रवास सुरक्षित प्रवास महणून अनेकांचे रेल्वेला प्राधान्य राहते. वर्षभर सर्वच स्थानकांवर प्रवाशांची गर्दी राहते. प्रवाशांना सुखकर व सर्व सोयींनीयुक्त सुविधा देण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून काळजी घेतली जाते. लांबपल्लूयाच्या प्रवासात प्रत्येक जण हमखास रेल्वेने जाण्यालाच पसंती दर्शवितो. मात्र प्रवासादरम्यान अनेकदा घाई गडबडीत जवळचे साहित्य, लहान मुले विसरण्याच्या घटना घडतातअशावेळी घाबरून जाण्याची कुठलीच गरज नाही. कारण त्यासाठी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिस सदैव तत्पर असतात. तसेच रेल्वेमध्ये व रेल्वेस्थानकात माहिती दर्शविणारे फलकदेखील लावलेले असतात. त्यामुळे अशी घटना घडल्यास तातडीने रेल्वेच्या टोल फ्री क्रमांकासहअधिकारी, कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**तरीही घेतला जातो शोध–** रेल्वेत प्रवासादरम्यान हरविलेली बॅग परत मिळणार नाही. म्हणून अनेकजण तक्रार देत नाहीत. गावाकडे जाण्याची गडबड राहते. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करतात. असे असले तरी रेल्वे प्रशास-नाकडून बॅगमधील साहित्य, वस्तू, पत्ता मिळाल्यास अशा विविध बाबींच्या आधारे, तसेच प्रवासी कोणत्या स्टेशनवर उतरला याची माहिती घेऊन संबंधित मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात.

### रेल्वेत साहित्य विसरले, काय कराल?

– रेल्वेतून प्रवास करताना चुकून सँग किया इतर साहित्य विसरल्यास अशावेळी रेल्वेच्या टोल फ्री कमांक १३९ वर संपर्क साधावा किंवा संबंधित स्टेशनवर उतरल्या- नंतर तेथील स्टेशन मास्टर, आरपीएफ, जीआरपी किंवा रेल्वे पोलिसांना माहिती द्यावी.

प्रवासादरम्यान रेल्वे प्रशासन, रेल्वे पोलिस प्रवाशांची काळजी घेतात. त्यामुळे प्रवासादरम्यान साहित्य हरविल्यास, लहान मूल हरविल्यास १३९ या टोल फ्री क्रमांकवर संपर्क साधावा, रेल्वे प्रशासन, रेल्वे पोलिसांना तातडीने माहिती द्यावी.

– जनसंपर्क अधिकारी रेल्वे विभाग



# करन्सी नव्हे तर कॉन्फिडन्स हवा हिच डॉ.आंबेडकरांची ताकद – आ.प्रदिप ईश्वर

## महामानवांचा ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्य नया अकोला येथे अभिवादन सभा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती–**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्येच देव पाहतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो डोक्यावर घेऊन विधानसभेत प्रचार केला. एक लाख मते घेऊन कोट्यधीश असलेल्या आरोग्यमंत्र्याला पराभूत करून निवडून आलो आहे. करन्सी नव्हे तर कॉन्फिडन्स असायला हवा, हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ताकद असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे कर्नाटक येथील सर्वात युवा आमदार प्रदीप ईश्वर यांनी केले.

नया अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थीस्मारक बुद्धविहार येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नया अकोला अभिवादन यात्रा व अभिवादन सभेचे आयोजन शुक्रवारी (ता.६ डिसेंबर) करण्यात आले होते.आमदार प्रदीप ईश्वर आपल्या भाषणात म्हणाले की, एक वेळ अशी होती की एक दिवसाच्या जेवणाची ही पंचाईत होती, मात्र मी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संवैधानिक मार्गाचा अवलंब केला. माझा विरोधी उमेदवार पैशाने बलवान होता, माझ्याकडे पैसा नव्हता, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. डर के आगे जीत है या म्हणी प्रमाणे धैर्य व हिंमत असणे आवश्यक आहे. डॉक्टर, इंजिनियर होण्यासाठी कोर्स करावा लागतो मात्र तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिलेल्या मार्गावर चालण्यासाठी कुठलाही कोर्स करावा लागत नाही तर फोर्स असायला हवे. यशोमतीताई यांच्यामुळे अमरावतीला येणे शक्य झाले, हे माझे भाग्य असल्याचे आमदार ईश्वर म्हणाले.

याअभिवादन सभेला आमदार प्रदीप ईश्वर, माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, खा. बळवंत वानखडे मुख्य अतिथी म्हणून तर प्रमुख उपस्थितीमध्ये काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते ॲड. दिलीप एडतकर, माजी आमदार वीरेंद्र जगताप, प्रदेश सचिव हरिभाऊ मोहोड, माजी महापौर विलास इंगोले, समाजभूषण रामेश्वर अभ्यंकर, शिवसेना जिल्हाप्रमुख श्याम देशमुख,सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### संविधान वाचविण्यासाठी जीव गेला तरी चालेल – यशोमती ठाकूर

भारतीय संविधान वाचविणे केवळ एकट्या काँग्रेसचे काम नाही तर प्रत्येकाने हातात आता मशाल घेणे आवश्यक आहे. संविधान वा- चवण्यासाठी जीव गेला तरी चालेल संविधान विरोधकांना थांबविल्याशिवाय जीव सोडणार नाही. निवडणुकीत तुम्ही आम्ही गप्प राहिल- १. ईव्हीएम बाबा तसेच बदमाशी करून सत्ता ताब्यात घेतली आहे. बोगस मतदान झाले सर्व काही गोलमाल आहे. भगवा व निळा हे आपली त्यागाची चळवळ आहे. ही चळवळ आम्ही हातात घेतली नाही तर ते आम्हाला ठेचून टाकतील, असा इशारा यावेळी यशोमती ठाकूर यांनी दिला. अभिवादन यात्रा व अभिवादन सभा अविरत सुरू राहावी, काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे ओबीसींचे जा- तनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी करीत आहेत. मात्र ती केली जात नाही. जनगणनेसाठी आपण रस्त्यावर का उतरत नाही, असा सवाल यावेळी उपस्थितांना माजी मंत्री ॲड. यशोमतीताई ठाकूर यांनी केला.

# पिकात बगळ्यांचा थवा; पीक संकटात असल्याचा संदेश

## शेतकऱ्यांनो जागे व्हा: वेळीच उपाययोजना करणे महत्त्वाचे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७तिवसा –** रब्बी हंगामाची लागवड शेवटच्या टप्प्यात आहे. काही शेतांत पीक जमिनीच्या वर आले आहे. तर काही शेतात लागवड सुरु आहे. अशातच ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळी दिसत आहे. परंतु, ती अळी स्पष्टपणे नजरेत येत नाही. मात्र, बगळ्यांचा थवा पिकांच्या शेतात हटकून थबकतो आहे. अशावेळी जागृत शेतकऱ्यांनी पिकात अळी असल्याचे समजून चाचपणी करणे गरजेचे आहे.

आठवडाभरापासून ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे शेतपिके संकटात आहेत. भाजीपाल्याच्या उत्पादनातही मोठा फरक जाणवत आहे. अशातच शेतकऱ्यांनी लावलेल्या पिकात अळीने आपले बस्तान मांडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नियोजितवेळापत्रकानुसार अभ्यास करून कीड नियंत्रण करणे महत्वाचे आहे बगळा हा पक्षी शेतकऱ्यांचा मित्र आहे. पिकांवरील अळीचे अप्रत्यक्ष नियंत्रण बगळा करतो. याकरिताशेतकऱ्यांनीसुद्धा पिकात पक्षिथांबे लावणे गरजेचे आहे. जेणेकरून पक्ष्यांना पिकांवरील अळी नजरेत भरून नैसर्गिकरीत्या तिचे नियंत्रण करणे शक्य होईल. एक एकर जागेत बांधानाचा हिशेब घेऊन किमान २० ते २५ पक्षिथांबे तयार करावे. यामुळे पक्षी आपल्या निवांत थांब्यावर अन्नाची गरज म्हणून थांबतील. हळूच आपले सावज हेरतील. कृषी विभागाच्या वतीने पक्षिथांबे लावण्याची शिफारस केलेली आहे. शेतकऱ्यांनी शून्य खर्चातील उपाय म्हणून पक्षिथांबे लावणे गरजेचे आहे.



# राज्यात उद्यापासून पुन्हा थंडीचा प्रभाव

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७अमरावती–**

राज्यातील काही भागांत अजूनही ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे किमान तापमानात वाढ होत आहे. या कारणामुळे राज्यात पुन्हा ८ किंवा ९ डिसेंबरपासूनच थंडीचा प्रभाव जाणवेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. राज्यातील पावसाचे येलो अलर्ट संपले आहेत. मात्र काही भागात अजूनही ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे किमान तापमान २१ ते २३ अंशांवर, तर कमाल तापमान ३१ ते ३२ अंशांवर गेल्याने राज्यात सर्वंत्र उकाडा जाणवत आहे. उत्तर भारतात ८ डिसेंबरपासून नवा पश्चिमी चक्रवात सक्रिय होत असल्याने त्यानंतरच महाराष्ट्रात तिकडून शीतलहरी येण्यास सुरुवात होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.



# गुन्हेगारांवर वचक ठेवण्याचा पोलिसांचा प्रयत्न असतोच !

## मराठी पत्रकार भवनात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची 'मीट द प्रेस'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –**गुन्ह्यांचे स्वरूप बदलत आहे. गुन्हेगारीची पद्धत वेगळी होत आहे. तरूणांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. शहरातील घटना लक्षात घेता अनेक भागात पोलीसांतर्फे कारवाई करण्यात आली. अनेक पॉकेट्समध्ये ही कारवाई झालेली आहे. पोलीसांचा धाक असला पाहिजे, असे सांगितले जात असले तरी ही बाब पूर्णपणे अंमलात येऊ शकत नाही. सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यात अटक करताना अडचणी येतात. मानवाधिकारा मुळे बेधडक कारवाई करण्यात अडचणी येत असतात. गुन्हेगारांवर वचक ठेवण्याचा आमचा प्रयत्न असतो. यासाठीच ॲक्टीव्ह पोलीसींग महत्वाचे असल्याचे मत पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी व्यक्त केले. वालकट कंपाऊंड येथील जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे शुक्रवारी (ता. सहा) आयोजित मीट द प्रेस कार्यक्रमात पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पत्रकारांशी दिलखुलास पणे संवाद साधला. पोलीस आयुक्तालयाची धुरा सांभाळतांना अनेक अनुभव आले आहेत. परंतु आपल्या कार्य काळात आपण सीसी टीव्हीचा मुद्दा लावून धरला. काही प्रमाणात त्याच यश मिळाले. यासोबतच महिलांच्या सुरक्षेला प्राथमिकता दिली आहे.



या गुन्ह्यात घट आणणे महत्वाचे आहे. असे सांगत आयुक्तांनी त्यांची कारकींद व अमरावती शहरातील कामगिरीची माहीती दिली. त्यांनी सांगितले की, आपल्या कारकिंदीत आपणास डी. शिवानंद, भूषणकुमार उपाध्याय, राकेश मारिया, अमितेश कुमार आदी अधिकारी आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत राहीले आहेत. त्यांच्या सोबत कार्य करण्याचा आपला अनुभव वेगळा होता, असे देखील पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

**ड्रग्ज विरोधात कारवाई**

आपल्या कार्यकाळात आपण एमपीडीए प्रमाणेच ड्रग्ज विरोधात कारवाई केली. मोठ्या प्रमाणात ड्रग्ज जप्त केले असून आरोपींना देखील अटक केली. तरूण पिढीला या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पोलीस- ंची ही कामगिरी महत्वाची ठरत आहे. सायबर गुन्हेगारापासून बचाव करण्यासाठी पोलीसांनी शाळा व महाविद्यालय पातळीवर जन जागृती केली असल्याचे सीपींनी सांगितले.-

### समाजाभिमुखता आवश्यक

पोलीस दलात बिट्स सक्षम असल्यास अनेक कामे सोपी होतात. आपण आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांना भेटी दिल्या असून अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांचे बिट्स स्ट्राँग करण्याच्या सूचना दिल्या आ- हेत. पोलीस समाजभिमुख झाले तरी आणखी समाजभिमुखता आवश्यक आहे. अधिकारी बदलत असले तरी समाज व पोलीस खाते यांच्यात सुसंवाद असला पाहिजे. याकरिता पोलीसांची सामाजिकता महत्वाची असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

### तपोवन, एमआयडीसी व साईनगर तीन नवे पोलीस ठाणे

अमरावती शहराची व्याप्ती वाढत आहे. अमरावती, बडनेरा मतद- ारसंघासह तिवसा विधानसभा मतदारसंघातील बराचसा भाग आयुक्तालय हद्दीत येतो. त्यामुळे आयुक्तालयात आणखी तीन नव्या पोलीस ठाण्यांची निर्मिती आवश्यक आहे. तपोवन, एमआयडीसी व साईनगर या तीन भागात तीन नवे पोलीस ठाणे निर्माण झाल्यास पोलीसांनी अधिक सक्षमपणे काम करता येणार नसल्याचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

# मनपा निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीत बिघाडी?

## हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून काँग्रेस-शिवसेना आमनेसामने, एक्सवर राडा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई-** विधानसभा निवडणुकीतील अपयश पचवून शिवसेनेने (ठाकरे) आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे यांनी 'हिंदुत्वा'चा नारा दिला आहे. हिंदुत्वासाठी शिवसेना आधीही लढत होती, उद्याही लढेल आणि पुढेही लढत राहणार. शिवसेना हिंदुत्वापासून दुरावल्याचा अपप्रचार खोडून काढा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या (ठाकरे) बैठकीत नेते, पदाधिकारी व माजी नगरसेवकांना दिले. शिवसेना नेत्यांनी त्यानुसार कामाला सुरुवातही केली आहे. मात्र, यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेचा नवा मित्र नाराज झाला आहे. या हिंदुत्वाच्या मुद्द्यामुळे आघाडीत बिघाडी झाल्याची देखील चर्चा आहे. तर काहीजण दावा करू लागले आहेत की मुंबई मनपा निवडणुकीआधी आघाडीत बिघाडी होऊ शकते.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिवसेनेने त्यांचा मित्र भाजपाशी असलेली पारंपरिक युती तोडली आणि पुरोगामी विचारांच्या काँग्रेसचा हात धरला. राष्ट्रवादी काँग्रेसलाही बरोबर घेत महाविकास आघाडी बनवली व अडीच वर्षे महाराष्ट्राची सत्ता सांभाळली. शिवसेना फुटल्यामुळे त्यांचं सरकार गेलं. मात्र उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी जपली. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षासह मविआला यश मिळालं. मात्र नुकत्याच झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत मविआ सपशेल अपयशी झाली आहे. मविआला राज्यात अवघ्या ४९ जागा जिंकता आल्या. ठाकरेंच्या शिवसेनेला केवळ २० जागांवर समाधान मानावं लागलं आहे. परिणामी आगामी महापालिका निवडणुकीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेने रणनिती बदलली आहे.

# 'पुष्पा' चित्रपटातील प्रसिद्ध लाल चंदनाचे झाड ताडोबा प्रकल्पात!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ चंद्रपूर-** पुष्पा नाम सुनके फ्लॉवर समझे क्या, फ्लॉवर नही, फायर है मै, हा पुष्पा चित्रपटातील डायलॉय सध्या सर्वत्र गाजत आहे. त्याला कारण दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जून याचा सुपरहिट पुष्पा चित्रपटाचा पुढचा भाग पुष्पा २ हा सिनेमा ५ डिसेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित झाला. लाल चंदनाच्या तस्करीवर हा चित्रपट आधारीत आहे. अतिशय महाग असलेले लाल चंदनाचे झाड हे जगप्रसिद्ध ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात देखील आहे. एक नाही तर अशी तीन झाडे ताडोबा प्रकल्पात आहेत.

पुष्पा चित्रपटापासूनच लाल चंदन प्रसिद्धीच्या झोतात आले होते. या लाल चंदनाच्या अनेक रंजक कथाही प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यामुळे या लाल चंदनाला अधिकच महत्व प्राप्त झाले. या लाल चंदनाची किंमत कोट्यावधीच्या घरात असल्याचे सांगण्यात येते.आता हेच लाल चंदन ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलात देखील असल्याची माहिती मोहुर्लीचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे यांनी दिली. ताडोबातील मोहर्ली वनपरिक्षेत्रात वन विभागाचे विश्रामगृह परिसरातच लाल चंदनाचे हे झाड उभे आहे. सध्या या लाल चंदनाला अतिशय मागणी असल्याची माहितीही थिपे यांनी दिली. लाल चंदनाची एकूण तीन झाडे येथे आहेत. या तिन्ही झाडांची आम्ही योग्य पद्धतीने निगा राखतो अशीही माहिती थिपे यांनी दिली. पुष्पा चित्रपटापासून लाल चंदन प्रसिद्धीच्या झोतात असले तरी ताडोबात बऱ्याच वर्षांपासून लाल चंदनाचे झाड आहे. बऱ्याच लोकांना या झाडाबद्दल पुरेशी कल्पना नाही. अनेकांना तर ताडोबात देखील लाल चंदनाचे झाड आहे याचीही माहिती नाही.मात्र बऱ्याच वर्षापासून हे झाड ताडोबात बहरते आहे. या झाडाची विशेष निगा राखण्यासाठी म्हणून तिथे एक चबुतरा केला आहे तसेच झाडावर त्याचे नाव देखील लिहिले आहे. ताडोबाच्या जंगलात येणारे पर्यटक तसेच वन्यजीव अभ्यासक ताडोबा प्रकल्पात देखील लाल चंदन आहे काय अशी विचारणा करतात, तसेच ताडोबात येणारा पर्यटक हा लाल चंदनाचे झाड बघूनच ताडोबा प्रकल्पाच्या बाहेर पडतो. ताडोबातील वाघांचे जसे पर्यटकांना आकर्षण आहे तसेच आता लाल चंदनाचे झाडही आकर्षणाचा विषय बनला आहे. पुष्पा चित्रपटानंतर आता या झाडाला बघणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

# अजित पवारांची ईडीने जप्त केलेली मालमत्ता मुक्त!

## ठाकरेंची शिवसेना म्हणाली, लोकशाही बळकटीकरणाच्या लढ्याला यश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ईडीने जप्त केलेली मालमत्ता मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दिल्ली ट्रिब्यूनल कोर्टाने हा मोठा निर्णय दिला आहे. अजित पवारांना न्यायालयाने एकीकडे दिलासा दिला आहे तर दुसरीकडे त्यांच्यावर आणि सरकारवर आता विरोधकांकडून टीका होऊ लागली आहे. शिवसेनेच्या (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी यावरून अजित पवारांना खोचक टोला लगावला आहे. अंधारे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की आयकर विभागाने जप्त केलेली अजित पवारांची मालमत्ता सहीसलामत दादांना परत केली! लोकशाही बळकट करण्यासाठी अजित पवारांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे! लोकशाही बळकटीकरणाचा हा खडतर लढा भावना गवळी, यशवंत जाधव, रवींद्र वायकर, राहुल कनालसह काही चित्रविचित्र लोकांनीसुद्धा मोठ्या हिमतीने लढला होता!

सुषमा अंधारे यांनी एक्सवर एक व्हिडीओ देखील जारी केला आहे. या व्हिडीओत त्यांनी म्हटलं आहे की कालच अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि आज लगेचच अजित पवारांची आयकर विभागाने जप्त केलेली संपत्ती सहीसलामत त्यांना परत केली. खरं म्हणजे लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अजित पवारांनी जो अत्यंत कष्टाने लढा दिला होता

त्या लढ्याला एका अर्थाने यश प्राप्त झालेलं आहे. हा लोकशाही बळकटीकरणाचा, महाराष्ट्राच्या विकासाचा अत्यंत खडतर लढा याच्याआधी सुद्धा लढवला गेला आहे. भावना गवळी, यशवंत जाधव, रवींद्र वायकर, राहुल कनालसह काही चित्रविचित्र लोकांनीसुद्धा मोठ्या हिंमतीने हा लढा दिला होता! या शूरवीरांनी मोठ्या ताकदीने हा पराक्रम बजावला होता. त्या सगळ्या शूरवीरांचे खूप खूप अभिनंदन आणि त्यांचा लढा यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टीने सगळ्या स्वायत्त यंत्रणांना सगळे नियम बाजूला ठेवून माणुसकीच्या भावनेतून हे निकाल लावायला मदत केली त्या भारतीय जनता पार्टीचे सुद्धा मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार सुद्धा.

# शाळेत खिचडी खाल्ली ....

# चंद्रपूर जिल्ह्यात ९६ विद्यार्थी रुग्णालयात दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७चंद्रपूर-**
चंद्रपूर जिल्ह्यात सरकारी शाळेत मध्यान्ह भोजन घेतल्याने ९६ विद्यार्थी आजारी पडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त होत असल्याने अधिकार्यांकडून तपास केला जात आहे.

दरम्यान आजारी पडलेले हे विद्यार्थी पहिली ते सातवीपर्यंतच्या वर्गामधील आहेत आणि चंद्रपूर जिल्ह्यातील पार्डी गावात शिक्षण घेत आहेत. आजारी पडल्यानंतर या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शाळेतील मध्यान्ह भोजन तयार करणारा स्वयंपाकी देखील आजारी पडला आहे.

शाळेत ९६ विद्यार्थ्यांनी शाळेत खिचडी खाल्ली आणि नंतर ते घरी गेले. त्यानंतर रात्रीपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास होऊ लागला. आजारी पडणार्या विद्यार्थ्यांची संख्या वाढताना पाहून त्यांना ताबडतोब सावली ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण रुग्णालयाच्या मर्यादीत क्षमतेमुळे काही विद्यार्थ्यांना मुल येथील उप-जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर येथील जिल्हा रुग्णालय आणि गडचिरोली येथे जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.

सिव्हिल सर्जन डॉ. महादेव चिंचोले यांनी दिलेल्या माहितीनुसार बाधित विद्यार्थ्यांची संख्या ९६ पर्यंत पोहचली आहे. तसेच त्यांनी सर्व विद्यार्थ्यांची तब्येत स्थिर असून त्यांच्यावर तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याचे देखील त्यांनी सांगितले. घटनेच्या प्राथमिक तपासात विद्यार्थ्यांना अन्नातून विष बाधा झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान राज्याच्या शालेय विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून या प्रकरणाची चौकशी केली जात आहे. दरम्यान या प्रकरणाची चौकशी सुरू असून, दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे क्षेत्र शिक्षणाधिकारी मोरेश्वर बोंडे यांनी सांगितले.

# व्यवसाय उभारताय? अण्णाभाऊ साठे महामंडळ देणार ५० लाखांपर्यंत कर्जआर्थिक योजना :

## मातंग समाजासह तत्सम जातीसाठी सवलत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती-**साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील कुटुंबाची सामाजिक व आर्थिक प्रगती व्हावी यासाठी एनएसएफडीसी योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत गरजू व पात्र लाभार्थ्यांना ५ लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत विविध व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.मातंग समाज व तत्सम समाजातील १२ पोट जातीतील कुटुंबाची सामाजिक व आर्थिक प्रगती व्हावी यासाठी कर्ज योजना राबविली जात आहे. या समाजातील नागरिकांचा विकास व्हावा यासाठी योजना राबविली जात आहे. यासाठी कर्ज प्रस्ताव केंद्रशासनाने विकसित केलेल्या 'पीएम- सूरज' या पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने सादर करता येतो. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

**कोणती कागदपत्रे आवश्यक?-** कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (उत्पन्न मर्यादा : शहरी व ग्रामीण ३ लाखांपेक्षा कमी असावे) अर्जदाराचे छायाचित्र, शिधापत्रिका छायांकित प्रत, आधार कार्ड, यापूर्वी कर्ज/अनुदान न घेतल्यासंबंधी प्रतिज्ञापत्र जमीन / दुकानाच्या उपलब्धतेचा पुरावा जागा भाड्याने घेणार असल्याचा भाडेकरार, व्यावसायिक तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभव/ प्रशिक्षणाचा पुरावा आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्जदाराला ७५ टक्के एन.एस.एफ.डी.सी., २० टक्के बीजभांडवल (१० हजार रुपयांच्या अनुदानासह) व ५ टक्के अर्जदाराचा स्वतःचा सहभाग आवश्यक असतो.

# 'पारंपरिक'च्या तुलनेत मसाला पीकांचे उत्पादन फायदेशीर

## जिल्हाधिका-यांच्या हस्ते निविष्ठावाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अकोला-** जिल्ह्यात मसालावर्गीय पीकांचे क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी वसंत अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न होत आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते म्हैसपूर येथे मसालावर्गीय पीकांच्या निविष्ठांचे वाटप करण्यात आले. जिल्ह्यात ७२० एकरांवर मसालावर्गीय पीकांची प्रात्यक्षिके राबविण्यात येत आहेत.

जिल्ह्यात मसाला पीकांचे क्षेत्र वाढावे व शेतक-यांना कमी खर्चात अधिक उत्पादन मिळावे यासाठी तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मिरची व भाजीपाला संशोधन केंद्राच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

अकोला जिल्ह्यात २१७ एकरावर काळजिरे, १०० एकरावर सोप, २१७ एकरावर ओवा, ५० एकरावर कसुरी मेथी, १०० एकरा धणे अशा एकूण ७२० एकरावर प्रात्यक्षिके राबविण्यात येत आहेत. याअनुषंगाने जिल्हाधिका-यांनी म्हैसपूर येथे भेट देऊन शेतक-यांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्या हस्ते गुरूवर्य सेंद्रिय उत्पादक गटाचे अध्यक्ष मनोहर रोकडे यांना मसाला पिकांच्या बियाणे निविष्ठावाटप करण्यात आले.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक डॉ. मुरली इंगळे, संशोधन केंद्राचे बियाणे पैदासकार डॉ. श्याम घावडे, विजय शेगोकार, मेघा नागे, शालिनी निखाडे आदी उपस्थित होते.

# दोघेही एकमेकांच्या चारित्र्यावर संशय घ्यायचे अखेर पतीने पत्नीच्या चेहऱ्यावर फेकले सिड




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती-**
कौटुंबिक कलहातून पतीने पत्नीच्या चेहऱ्यावर सिड फेकले. यामध्ये पत्नी गंभीररित्या भाजली असून तिच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास खोलापुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा कॉलनी परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये घडली. या प्रकरणी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

स्वाती शुभम आंधळे (३२) असे गंभीररित्या भाजलेल्या पत्नीचे तर शुभम भास्करराव आंधळे (२६) असे आरोपी पतीचे नाव आहे. शुभम हा पत्नी स्वाती यांच्यासह म्हाडा कॉलनी परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये राहतो. दोघेही एकमेकांच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने त्यांच्यात नेहमी खटके उडत होते. गुरुवारी रात्री शुभमने पत्नी स्वाती यांना साडेतीन हजार रुपये मागितले. परंतु, स्वाती यांनी पैसे देण्यास नकार दिला. या कारणावरून शुभमने पत्नी स्वाती यांच्यासोबत वाद घालून त्यांचा मोबाइल फोडला. त्यावर स्वाती यांनी रागाच्या भरात पती शुभम याच्या दुचाकीचा हेडलाइट फोडला. वाद विकोपाला गेल्यावर शुभमने घरातील बाथरूममधील सिड आणून पत्नी स्वाती यांच्या चेहऱ्यावर फेकले. त्यात स्वाती या गंभीररित्या भाजल्या. त्यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. आवाज ऐकून शेजाऱ्यांनी तेथे धाव घेतली. शेजाऱ्यांनी घटनेची माहिती खोलापुरी गेट पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून गंभीररित्या भाजलेल्या स्वाती यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. या घटनेत स्वाती या १३ टक्के भाजल्या असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शुभमविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विजय गरुड करीत आहेत.

# घरगुती गॅस ऑटोरिक्षामध्ये भरून देणाऱ्यावर गुन्हा

## पुरवठा विभागाची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अकोला -** एका व्यक्तीकडून घरगुती वापरासाठीचा गॅस ऑटोरिक्षामध्ये भरून विक्री करत असल्याची माहिती गुरूवारी (५ डिसेंबर) दुपारी मिळताच पुरवठा विभागाच्या पथकाने तत्काळ कारवाई करत संबंधितावर जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील अकोट फाईल येथील गणेश शिवाजी घुले ही व्यक्ती घरगुती वापरासाठीचा गॅस ऑटोरिक्षामध्ये भरून विक्री करीत असल्याची माहिती पुरवठा पथकाला मिळाली. त्या माहितीवरून जिल्हा पुरवठा अधिकारी निखिल खेमनार, पुरवठा निरीक्षक रामेश्वर भोपळे अन्नधान्य वितरण अधिकारी रविंद्र येण्णावार, अव्वल कारकून योगेश सातव यांनी पंच व पोलीस अंमलदार यांना घेऊन तपासणी केली. त्यानुसार ग्रीन पार्कसमोर खुल्या जागेत एक इसम घरगुती सिलेंडरमधुन मशिनद्वारे ऑटोमध्ये गॅस भरताना दिसुन आले. पोलिसांच्या मदतीने संबंधितांस विचारणा करून ताब्यात घेण्यात आले.

घटनास्थळी १३ सिलेंडर दिसुन आले. सिलेंडरची पाहणी केली असता त्यामध्ये एचपी गॅस कंपनीचे १३ सिलेंडर पैकी ९ सिलेंडर भरलेले किंमत २९ हजार २२३ रूपये व ४ रिकामे सिलेंडर किंमत ८ हजार ८०० रूपये असा एकुण ३८ हजार २३ रूपये चे सिलेंडर दोन मशिन व तिन वजन काटे व ४ ॲटो चालकासह गॅसे भरणेकरिता उभे दिसुन आले. यामधे मुद्देमालासह ४ ॲटो अंदाजे किंमत ६ लाख रुपये असा एकुण ६ लाख ५८ हजार रू. चा मुददेमाल जप्त करून ताब्यात घेतला.याप्रकरणी आरोपीविरूध्द कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# तिबेटियन उबदार कपड्यांची विक्री ३५% घटली

## गेल्या १२ वर्षांतील चित्र; ऑनलाइन खरेदी, वातावरण बदलाचा परिणाम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती-** हिवाळ्यात कडाक्याच्या थंडीत गरम कपड्यांना मोठी मागणी असते. परंतु, अलीकडच्या काही वर्षांत वाढलेला ऑनलाइन व्यापार आणि वातावरणातील बदलामुळे कमी झालेला थंडीचा कडाका याचा विपरित परिणाम शहरातील तिबेटियन स्वेटर विक्रेत्यांच्या व्यवसायावर झाला आहे. साधारणत: १२ वर्षांपूर्वी म्हणजे २०१२ च्या तुलनेत गरम कपड्यांच्या विक्रीचे प्रमाण सरासरी ३५ टक्क्यांनी घटल्याची माहिती तिबेटियन स्वेटर विक्रेते व्यापारी सोनम ताशी यांनी दिली.

गेल्या आठवड्यात काही प्रमाणात थंडी वाढली होती. त्यामुळे आता ग्राहकांची संख्या काहीशी तिबेटियन विक्रेत्यांना अपेक्षा होती. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने थंडी थोडी कमी झाल्याने पुन्हा एकदा उबदार कपड्यांची विक्री काहीशी घटली आहे. शहरातील अनेक भागात जानेवारी महिन्यापर्यंत त्यांचे स्टॉल असतात. यंदाही तिबेटियन स्वेटर विक्रेत्यांनी उबदार कपड्यांची ५ दुकाने थाटली आहेत. टोपी, जॅकेट यांना मागणी असते.

**जॅकेट ५०० रुपयांपासून ते १,५०० रुपयांपर्यंत**

ग्लोबल वार्मिंगमुळे वाढलेले तापमान व ऑनलाइन व्यापाराचा आमच्या व्यवसायाला फटका बसला आहे. जागेचे भाडे व राहण्याचा खर्च व उत्पन्न याचा ताळमेळ घालणे अवघड होते. यावर्षी किमती वाढवलेल्या नाहीत. -तिबेटियन स्वेटर विक्रेते

# विधान परिषदेच्या सभापतीपदी नीलम गोऱ्हे यांचे नाव जवळपास निश्चित?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ मुंबई**

राज्यात महायुती सरकारचा शपथविधी झाल्यानंतर आज शनिवारपासून विधिमंडळाच्या तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात होत आहे. नव्या आमदारांना या विशेष अधिवेशनात शपथ दिली जाणार आहे. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर हे २८७ नवनिर्वाचित आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ देतील. दरम्यान, विशेष अधिवेशनात विधान परिषद सभापतींची निवड होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेचे सभापतीपद मागील दोन वर्षांपासून रिक्त आहे. सोमवारी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होणार असून त्याच दिवशी विधान परिषदेच्या सभापतींची निवडणूक होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेचे सभापतीपद एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला जाणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे.



विधान परिषदेच्या सभापतीपदासाठी नीलम गोऱ्हे यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. नीलम गोऱ्हे सध्या विधान परिषदेच्या उपसभापती आहेत. गोऱ्हे यांना विधान परिषदेचे सभापतीपद मिळाल्यास त्या राज्याच्या पहिल्या महिला विधान परिषदेच्या सभापती असतील. लाडकी बहीण योजना ही सरकारची महत्त्वकांक्षी योजना आहे. त्यामुळे सभापती पदाचा मान हा एका महिलेला मिळण्याची शक्यता आहे.

**सोमवारी विधानसभा अध्यक्ष निवड**

शनिवार आणि रविवारी दोन दिवसांत आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर तिसर्या दिवशी सोमवारी विधानसभेचा नवा अध्यक्ष निवडला जाईल. या पदासाठील अगोदर निवडणूक कार्यक्रम घोषित केला जाईल. विधानसभा अध्यक्ष निवडीनंतर विधिमंडळाच्या संयुक्त बैठकीत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिभाषण होईल.

# वर्षातून एकदा आरोग्य शिबिर घेणे अनिवार्य : शिक्षण विभाग

## विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय सेवेचा अहवाल आता दर आठवड्याला सादर करावा लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या सर्व शाळांमध्ये दररोज किमान सहा ते सात तास विद्यार्थी उपस्थित असतात या कालावधीत काही विद्यार्थ्यांना तातडीने वैधकीय उपचारांची गरज भासू शकते. त्यामुळे अशा परिस्थितीत शाळा प्रशासनाने समयसूचकता दाखवून तातडीने कारवाई केल्यास विद्यार्थ्यांना वैदकीय मदत वेळेकर मिळेल. यामुळे अनुचित घटना टाळता येणे शक्य होणार आहे. दरम्यान आता सुविधा देण्याबाबत दर आठवड्याला सूचनांच्या अंमलबजावणी

बाबतचा अहवाल शासनाला सादर करणे आवश्यक असल्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहे.जिल्ह्यात जिल्हा परिषदेसह महापालिका, नगरपालिका, नगरपंचायतसह इतर विविध २ हजार ८०० शाळांचा त्यामध्ये समावेश आहे. विद्याध्यौना तातडीने वैद्यकीय मदत पुरवण्यासाठी मुख्याध्यापक,




शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी सहायकांनी याबाबत नेहमी सजग असणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यौना तातडीच्या या काळात वैद्यकीय सुविधा देण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे जारी केल्या आहेत. प्रथमोपचारासाठी आजारी विद्याश्र्थ्यांना यानुसार शाळेमध्ये तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी सोयी-सुविधा उपलब्ध कराव्या लागणार आहे. यामध्ये संचालक, उप संचालकांना मासिक आढावा, गरजेनुसार शिक्षणाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करावे लागणार आहे. प्राथ, माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांनी आठ आठवड्यांच्या आत शास-पास कार्य पूर्तता अहवाल सादर करावा, तसेच प्रतिक्यों जानेवारी ते जुलै महिन्यात आढावा घेऊन शास्नाला एकत्रित अहवाल द्यावा, अशा सूचनाशिक्षण विभागाने दिल्या.

**प्रमुख मार्गदर्शक सूचना अशा**

शाळेत आवश्यकतेनुसार प्रथमोपचार पेट्या ठेवाव्या. मुलांना तातडीने लागणारे वैद्यकीय सामान त्यात असावे. वर्षात एकदा वैद्यकीय तपासणी शिबिर घ्यावे. तातडीने प्रथमोपचार प्रशिक्षण द्यावे. रुग्ण वाहिकांचे संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावावे. विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास वाहन असणे गरजेचे. विद्यार्थ्यांना तणाव मुक्तीसाठी कार्यशाळा घ्यावी. विद्याथ्यर्थ्यांना समुपदेशकाची व्यवस्था करणे आवश्यक आहे. शाळेत आवश्यकतेनुसार समन्वयक नेमावे लागणार आहे.

# ६६ सहकारी संस्थांची निवडणूक जिल्हा उपनिबंधक कार्यालय सज्ज




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

वर्षभरात सहकारातील १५१ संस्थांच्या निवडणुका डोक्यावर असताना नव्या वर्षात ६६ संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी जिल्हा उपनिबंधक कार्यालयावर येणार आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या दरम्यान ६६ संस्थांची मुदत टप्पाटप्प्याने संपणार आहे. त्यामुळे मुदत संपताच जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून निवडणुका लावण्यात येईल.जिल्ह्यात या वर्षात क वर्गातील २६, ब वर्गातील ३७ व ड वर्गातील ८८ अशा १५१ सहकार संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. यामध्ये सेवा सहकारी संस्थांसह पतसंस्था, संघटना, पणन, औद्योगिक संस्था, रुग्णालय संस्था आदी संस्थांचा समावेश असून, या निवडणुकांना सलग चौथ्यांदा मुदतवाढ दिली आहे. आधी लोकसभा, त्यानंतर पावसाळा आणि विधानसभेमुळे या निवडणुकांना ३१ डिसेंबरपर्यंत स्थगिती आहे. परंतु, विधानसभा निवडणुका संपल्याने रखडलेल्या निवडणुकांच्या तयारीला उपजिल्हा निबंधक कार्यालय सज्ज झाले.


**या संस्थांचा संपणार कार्यकाळ**

पुढील वर्षात ब वर्गातील ६, क वर्गातील ३४ आणि ड वर्गातील २६ अशा ६६ विविध संस्थांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे टप्पाटप्प्याने या संस्थांची निवडणूक होणार आहे. यामध्ये सेवा सहकारी, नोकरदार, पतसंस्था, नागरी संस्था, पाणी वापर आदी विविध संस्थांचा समावेश आहे.

# ‘संत गाडगेबाबा यात्रे’निमित्त जड वाहतुकीस प्रतिबंध घाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त गाडगे बाबा समाधी मंदिर गाडगे नगर येथे १४ ते २१ डिसेंबरपर्यंत भागवत सप्ताह, कीर्तन व यात्रा मोठ्या भरते. यात्रेदरम्यान आजूबाजूच्या जिल्ह्यातील आणि ग्रामीण भागातील भाविकांची मोठ्या प्रमाणात येथे गर्दी राहते. त्यामुळे पंचवटी (डॉ. पंजाबराव देशमुख चौक) ते शेगाव नाकापर्यंत जड वाहनास प्रतिबंध घालावा, अशी मागणी उप महानगर प्रमुख विजय ठाकरे यांनी



पोलिस आयुक्तांना निवेदनातून केली आहे. यामध्ये एसटी बस, ट्रॅव्हल्स, रेतीचे ट्रक, गिट्टी बोल्डरचे ट्रक व अन्य जड वाहतुकीचा समावेश आहे.गाडगेबाबा नगरमधून जाणारा मार्ग राज्य महामार्ग असल्याने तसेच संपूर्ण शासकीय कार्यालय व महाविद्यालये या मार्गावर असल्याने वर्दळ राहते. त्यामुळे मोठे अपघात होण्याची शक्यता टाळता येत नाही. एखादा अपघात झाल्यास आणि जीवितहानी झाल्यास यात्रेला गालबोट लागू नये. यासाठी या रस्त्यावरील जड वाहतूक पूर्णपणे बंद करून ती वाहतूक वळवून बाबा रेस्टॉरंट ते लेखुमल चौक ते शेगाव नाका अशी करावी. अथवा संपूर्ण वाहतूक रिंग रोडवर वळवण्यात यावी, अशी मागणी विजय ठाकरे यांनी पोलिस प्रशासनाला निवेदनातून केली आहे.

# एसटीच्या ताफ्यात दीडशे बसचा तुटवडा

## अमरावती विभागाला १४५ गाड्यांची कमतरता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

एसटीच्या ताफ्यात दीडशे बसचाएकीकडे एसटीच्या ताफ्यात नव्या इलेक्ट्रिक गाड्या दाखल होत आहेत; पण सर्वसामान्य प्रवाशांची निकड लक्षात घेता सन २०१९ मध्ये ४६५ बसगाड्या होत्या. त्या तुलनेत अमरावती विभागाला १४५ गाड्यांची कमतरता असल्याने एसटी प्रशासनाला नियोजन करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे,



दुसरीकडे कमी एसटी बसमुळे मात्र प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.


अमरावती विभागात राज्य परिवहन महामंडळाचे अमरावती, बडनेरा, परतवाडा, दर्यापूर, चांदूर बाजार, मोर्शी, वरूड आणि चांदूर रेल्वे, असे आठ एसटी आगार आहेत. या आगारांमध्ये सन २०१९ मध्ये ४६५ एसटी बसगाड्या होत्या. एप्रिल २०२३ मध्ये बसची संख्या ३६५ वर आली. यामधील तब्बल १०० गाड्यांचे आयुर्मान संपल्याने टप्प्याटप्प्याने स्क्रॅप करण्यात आले. आल्यात. अशातच एप्रिल २०२४ मध्ये या एसटी बसची संख्या ३२६ वर आली आहे. येत्या मार्च महिन्यापर्यंत एसटी महामंडळाच्या ३२६ बस गाड्यांपैकी ४५ गाड्यांचे आयुर्मान संपल्याने टप्प्याटप्प्याने स्क्रैप करण्यात येणार आहेत. त्यामुळे तीन वर्षांपूर्वी अमरावती विभागात एसटीच्या ताफ्यात सुमारे ४६५ एसटी बस होत्या. ती संख्या मार्च महिन्यापर्यंत तरी यापैकी २८१ वर येणार आहे. अशातच मागील काही दिवसांपासून बसमध्ये बिघाडाचे प्रमाण वाढले आहे.

एसटी बसमध्ये इंजीन बिघाड, इलेक्ट्रिकल नादुरुस्त, ट्रान्समिशन फेल, एक्सेल तुटणे, सस्पेन्शन आदी समस्या उद्भवत आहेत. याशिवाय खराब रस्ते, वाहतूक कोंडी यामुळे गाड्यांना नियोजित वेळेत पोहोचता येत नाही. खड्ड्यांमुळे एसटी बसेसमध्ये बिघाडाचे प्रमाणही वाढले आहे.

# बहिरम यात्रेत यंदा ३ दुकानांची मर्यादा; पोटभाडेकरूंवरही ‘वॉच’

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

राज्यभरात चर्चेत राहणाऱ्या बहिरमबुवाच्या यात्रेत दरवर्षी दहा-पंधरा दुकाने भाड्याने घेऊन ती नंतर पोटभाडेकरूंना देत पैसा कमावण्याचा प्रकार सर्रास होत असतो. मात्र जि. प.च्या सीईओ संजीता महापात्र यांनी त्यास आळा घालण्याचा निर्णय घेतला असून, दुकानांसाठी तीनचे सिलींग लावले आहे. त्याचवेळी पोटभाडेकरूंवरही कठोर वॉच ठेवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या वर्षी महिला बचत गटांना तेथे स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाणार आहे.



नव्या नियमांमुळे यात्रेतील अतिक्रमणाला आळा बसणार असून अनेक खऱ्या गरजूंना दुकानासाठी भाड्याने जागा उपलब्ध होणार आहे. तसेच बहिरममार्गे जैनांचे तीर्थस्थळ असलेल्या मुक्तागिरीला जाणेही सुलभ होईल. ऐन रस्त्यांवर अतिक्रमण केल्याने दरवर्षी तेथे वाहनांची कोंडी होऊन छोटे-मोठे अपघात व्हायचे. त्यामुळे यंत्रणेची धावपळ व्हायची. याला आता आळा बसणार असून, सीईओंनी लक्ष घातल्यामुळे तेथे सुरक्षा व्यवस्थाही वाढवली जाणार आहे. अनेकांचे दैवत असलेल्या चांदूर बाजार तालुक्यातील बहिरमबुवाची यात्रा या वर्षी २० डिसेंबरला सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर महापात्र यांच्यासाठी हे नवे यात्रास्थळ आहे. त्याची ख्याती सर्वदूर असल्यामुळे त्यांनी स्वत:च त्याठिकाणी जाऊन देवस्थानासह जागेची पाहणी केली. पाहणीपूर्वी त्यांनी देवस्थानात पोहोचून बहिरमबुवाची आरतीही केली. आवश्यकतेनुसार पुन्हा त्या तेथे जाणार आहेत. ही यात्रा महाशिवरात्रीला संपते.

# भारताला महासत्ता बनवायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारणे गरजेचे आहे : प्रा. जयवंत पराते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती :**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथे डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी अभिवादन पर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश मोहरील अध्यक्ष स्थानिक विराजमान होते. तसेच इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. जयवंत पराते हे प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित होते.तर प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रंथालय



विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. विजय वर्डीकर हे मंचावर विराजमान होते.

सदर कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार आणि पुष्प वाहून करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विजय वर्डीकर यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले प्रा. जयवंत पराते विद्यार्थिनींना संबोधित करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक दर्जाचे विचारवंत होते. त्यांचे विचार काळाच्या पुढचे असून आजही ते आपल्याला प्रेरणादायी आहेत. त्यांनी विविध विषयात प्राबल्य मिळवून येणाऱ्या काळांना चालना देणाचे कार्य केलेले आहे. ते जलनीतीतज्ज्ञ, मानववंशतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, समाजसेवक, पत्रकार, वकिल, संपादक, प्राध्यापक आणि प्राचार्य अशा विविधांगी भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांनी भारताला दिलेले संविधान खूप मौल्यवान असून त्याची परीपूर्ण अंमलबजावणी झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नसल्याचे ते यावेळी म्हणाले.

तर आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश मोहरील आपल्या भाषणात म्हणाले की, बाबासाहेब हे सर्वव्यापी होते. त्यांचे विचार आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. ते फक्त दलित नेते नसून सर्वसमावेश नेते होते. आजच्या काळात त्यांच्या विचारांची आणि त्यांनी दिलेल्या संविधानाची भारताला नितांत गरज आहे. यानंतर ग्रंथालय सहाय्यक मा. निरंजन मेश्राम यांनी मोजक्या शब्दात मार्मिकपणे उपस्थित मान्यवर तसेच विद्यार्थिनींचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे संचलन मराठी विभागाचे प्रा. हेमंत सावळे यांनी यशस्वीपणे पूर्ण केले. तसेच या कार्यक्रमासाठी आरती कुशवाह आणि लक्ष्मी या विद्यार्थिनी विशेष सहाय्य केले.

# महाराष्ट्र विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आ.सुलभा खोडके यांचा सहभाग

## महायुती सरकारच्या वरिष्ठ नेत्यांसमवेत राज्य विधीमंडळात केला प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

महायुती सरकारचा शपथविधी आटोपताच आज शनिवार दिनांक ७ डिसेंबर २०२४ पासून महाराष्ट्र विधानसभा डिसेंबर २०२४ चे तीन दिवसीय विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. या अधिवेशनासाठी ३८-अमरावती विधानसभा मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके या राज्य विधीमंडळात दाखल झाल्या आहेत. महायुती सरकार मध्ये सहभागी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदार-सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी विधिमंडळात प्रवेश करण्यापूर्वी महाराष्ट्राचे आराध्य दैवत, स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन




करून मानवंदना अर्पण केली.

याप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, जेष्ठ नेते छगनराव भुजबळ, धनंजय मुंडे, गिरीशजी महाजन , अदितीताई तटकरे, हसन मुश्रीफ, संजय बनसोडे, दादाजी भुसे, नरहरी झिरवळ, सना मलिक, आदींसह महायुती-घटक पक्षाचे नवनिर्वाचित आमदार प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महायुतीच्या आमदारांनी जय भवानी जय शिवाजीचा जयघोष करून विधिमंडळ परिसर दणाणून सोडला.दरम्यान महायुती-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, जेष्ठ नेते छगनराव भुजबळ यांची भेट घेवून संवाद साधला. यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देवून अभिनंदनही करण्यात आले.

# मालमत्ता कर वसुली करीत वार्डात वसूली शिबिराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कर वसुली वार्डातील मालमत्ता धारकांना आवाहन करण्यात येते कि महानगरपालिका अंतर्गत येणा-या मालमत्ता कराचा भरणा करण्यास मालमत्ता धारकांना सोईचे होईल, नागरिकांचे श्रम व वेळ वाचविण्याच्या दृष्टिने अमरावती महानगरपालिका झोन क्र.१.२.३.४ व ५ अंतर्गत असलेल्या कर वसुली वार्डात माहे नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत प्रत्येक शनिवारी, रविवारी व सुटीचे दिवशी विविध ठिकाणी कर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. करीता सर्व मालमत्ता धारकांनी आपले थकीत व चालू मालमत्ता कराचा भरणा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे.तसेच, अमरावती महानगरपालिका अंतर्गत सर्व मालमत्ताधारकांने, आपले मालमत्ताचे मालमत्ता कर, माहे डिसेंबर ३१/१२/२०२४ पूर्वी भरणा करून दरमहा २ टक्के दंडात्मक कारवाई टाळावी असे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे.




# अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचं पिल्लू ठार

## चिरोडी ते कारला मार्गावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

अमरावती शहरालगत असणाऱ्या चिरोडी जंगलातील चिरोडी ते कारला मार्गावर अज्ञात वाहनाची धडक बसून एक वर्ष वयाचा बिबट्या ठार झाल्याची घटना घडली आहे. ही घटना शुक्रवारी (६ डिसेंबर) रात्री घडल्याचं सांगितलं जातंय. तर शनिवारी (७ डिसेंबर) पहाटे या घटनेसंदर्भात माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.



रात्रीच्या अंधारात अज्ञात वाहनानं दिलेल्या धडकेमुळं बिबट्याचं पिल्लू रस्त्याच्या मधातच मृत अवस्थेत पडलं. पहाटे या पिल्लाच्या आईनं आपल्या बाळाचं मृत शरीर रस्त्याच्या कडेला आणून ठेवल्याचं या परिसरातील ग्रामस्थांनी पाहिलं, असा दावा त्यांनी केला. शनिवारी पहाटे चिरोडी आणि कारला येथील ग्रामस्थांची घटनास्थळी गर्दी झाली असता घटनास्थळावरुन मृत बिबट्याची आई जंगलात निघून गेली .

**वन विभागाचं पथक दाखल**

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पथक सकाळी सात वाजता चिरोडी कारला मार्गावर असणाऱ्या घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा केल्यावर मृत बिबट्याला अंत्यसंस्कारासाठी वडाळी येथील बांबू उद्यान परिसरात आणण्यात आलं.

**काळजी घेण्याची गरज**

अमरावती शहरालगत असणाऱ्या पोहरा, मालखेड, चिरोडी या समृद्ध जंगल परिसरात गत अनेक वर्षांपासून बिबट्यांचा वावर आहे. या जंगलात बिबट्यांची विपुल संख्या असून इतर वन्य प्राण्यांनी हे जंगल समृद्ध आहे. या जंगलातील मार्गांवर ठिकठिकाणी नागरिकांना सावधपणे वाहन चालविण्याचे सूचना फलक लावणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी या भागातून जाताना नागरिकांनी देखील आपल्या वाहनाची गती मर्यादित ठेवणं गरजेचं आहे. या भागातील वन्य प्राण्यांसंदर्भात जनजागृतीची खऱ्या अर्थानं गरज आहे, असं राज्य वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य यादव तरटे म्हणालेत.



माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा.आ. प्रविण पोटे पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले यावेळी जयंत डेहनकर व मान्यवर उपस्थित होते.

# धक्कादायक! दुचाकीरून जात असताना खिशातच मोबाईलचा स्फोट; मुख्यध्यापकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ भंडारा**

मोबाईल ही आज काळाची गरज ठरत आहे, मात्र हाच मोबाईल जीवघेणा ठरू शकतो याची कुणी कल्पनाही करू शकणार नाही. अगदी मानसिक आजारांच्या विळख्यापासून ते फ्रॉडपर्यंत मोबाइलमुळे अनेक घटना घडत आहेत. याच मोबाईलमुळे चक्क एका मुख्याध्यापकाला प्राण गमवावे लागले. ही धक्कादायक घटना साकोली तालुक्यातील सिरेगावबांध या गावात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली.



मुख्याध्यापकाने खिशात ठेवलेल्या मोबाईलचा भयंकर स्फोट झाला. या स्फोटात मुख्याध्यापक गंभीर जखमी होऊन त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेली व्यक्ती जखमी झाली आहे. सुरेश संग्रामे असं मृत शिक्षकाचं नाव आहे तर नत्थु गायकवाड असं जखमी असलेल्या व्यक्तीचं नाव आहे.

सुरेश संग्रामे कुरखेडा तालुक्यातील कसारी जि.प. प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक होते. संग्रामे आणि गायकवाड हे दोघेही एका कार्यक्रमासाठी जात असताना अचानक संग्रामे यांच्या खिशातल्या मोबाईलचा फोनचा स्फोट होऊन कपड्याला आग लागली. त्या आगीत भाजल्याने त्यांना उपचाराकरिता रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर बाईकवर मागे बसलेले नत्थु गायकवाड हे गाडीवरुन पडल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत. मृत सुरेश भिकाजी संग्रामे हे गडचिरोली जिल्हा परिषदेच्या देसाईगंज/वडसा पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कसारी येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत होते. त्यांचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त करण्यात आहे.

# पी.आर. पोटे पाटील इंजिनिअरिंगच्या ४ विद्यार्थ्यांचे इंडोवन्स कंपनीत निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

पी.आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालय अमरावती येथे नुकताच पुणे येथील इंडोवन्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह पार पडला. इंडोवन्स कंपनी मध्ये सिव्हिल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला यामध्ये महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची निवड झाली. इंडोवन्स प्रायव्हेट लिमिटेड ही नामांकित कंपनी असून ही स्पेशलाइज्ड कॉम्प्युटर एडेड डिझाइन, ड्राफ्टिंग आणि बिझनेस सोल्युशन्स , मध्यम आकाराच्या व्यवसायापासून ते बहु-अनुशासनात्मक व्यवसाय महामंडळापर्यंतच्या जागतिक कंपन्यांना सर्व्हीस , २ऊ ड्राफ्टिंग, ३ऊ मॉडेलिंग किंवा डिझाइन वर कंपनीत कामे होतात . कंपनीची सर्व प्रक्रिया पार करत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील अश्लेषा तायवाडे, आदित बोंडे, दिक्षिका परवतकर मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रज्वल बिसणे या चार विद्यार्थ्यांची या कंपनीने निवड केली आहे.

# जुन्या वाहनांनाही आता हाय सिक्युरिटी नंबरप्लेटची सक्ती

## तीन एजन्सीला काम : ३१ मार्च २०२५पर्यंत 'एचएसआरपी' लावणे अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

गुन्हा करण्यासाठी वाहनांचा होणारा वापर रोखण्यासाठी व नंबरप्लेटच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नव्या वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट' (एचएसआरपी) लागू करण्यात आली. आता जुन्या वाहनांनासुद्धा 'एचएसआरपी'ची सक्ती केली जाणार आहे. त्यासाठी परिवहन विभागाने तीन एजन्सीची नियुक्ती केली असून शुल्कही निर्धारित केले आहे.

राज्यात २०१९ पासून नव्या उत्पादित वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट' सक्तीची केली आहे. वाहनाला एकदा ही नंबरप्लेट लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली ही नंबरप्लेट्स 'टॅम्परप्रूफ' असते. या नंबरप्लेटवर निळ्या रंगाच्या चक्राचे होलोग्राम व वाहन क्रमांकाच्या काळ्या तिरप्या ओळीत 'इंडिया' (इंग्रजीतील शब्द) अक्षरे लिहिलेली असतात. ही नंबरप्लेट ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनवलेली असते. परिवहन विभागाने ३१ मार्च २०२५ पर्यंत जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' लावणे अनिवार्य केले आहे.



**डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होणार**

आरटीओ तज्ज्ञानुसार, जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' बसविण्याचे काम तीन एजन्सीला देण्यात आले आहे. ही एजन्सी त्या-त्या आरटीओ कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्षेत्रात आपले फ्रेंचायझी सुरू करून वाहनांना नंबरप्लेट लावण्याचे काम करणार आहे. तूर्तास याची सुरुवात झालेली नाही; परंतु डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे.

**झोन १ मधील जुन्या वाहनांची जबाबदारी रोस्मर्टा सेफ्टी सिस्टमकडे**

झोन १ मधील जुन्या वाहनांसाठी नंबरप्लेट तयार करणे व लावण्याची जबाबदारी रोस्मर्टासाठी सेफ्टी सिस्टम लिमिटेड या एजन्सीला देण्यात आली. यात 'एमएच ४७, एमच ०४, एमएच ४६, एमएच ०९, एमएच १२, एमएच २६, एमएच २७, एमएच ३७, एमएच २९, एमएच ४९, एमएच ३१, एमएच ५१ या आरटीओ कोडमधील जुन्या वाहनांचा समावेश असेल.

**असे असणार शुल्क**

वाहनाचा प्रकार - ४५० रुपये
दुचाकी व ट्रॅक्टर - ५०० रुपये
तीनचाकी कार व इतर वाहने - शुल्क ७४५ रुपये

# तुषार भारतीय मित्र परिवार व अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धेचे आयोजन

## ९ डिसेंबरला अटल दौड कार्यालयाचे उद्घाटन : २१ किमी हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये प्रथम येणाऱ्या पुरुष व महिलांना टू व्हीलर मोटर गाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

तुषार भारतीय मित्र परिवार यांच्या वतीने गुरुकुल गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे बुधवार २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ५:४५ वा. दसरा मैदान, बडनेरा रोड, अमरावती येथे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल रोड स्पर्धेच्या मुख्य कार्यालयाचा उद्घाटन सोहळा सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी सायं ६ वा गुलशन प्लाझा जवळ, मंत्री मोटर्स समोर, राजापेठ चौक रोड, अमरावती येथे क्रीडा, शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.समाजाच्या सर्वांगीण स्वास्थ्यासाठी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था सातत्याने प्रयत्वशील राहिली आहे शारीरिक आणि मानसिक




स्वास्थ्य उत्तम असेल तरच विचार सकारात्मक राहतात आणि समाज म्हणून आपला खऱ्या अर्थाने विकास होती, अशी भूमिका राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धा आयोजनाच्या मागील असल्याचे मत मुख्य आयोजक भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केली आहे.राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा दसरा मैदान येथून प्रारंभ होऊन राजापेठ, कल्याण 'नगर, मोती नगर, राजेंद्र कॉलनी, काँग्रेस नगर, हॅलो कॉर्नर जिल्हाधिकारी कार्यालय, पंचवटी चौक, शेगाव नाका, विलास नगर, जुना कॉटन मार्केट, जयस्तंभ, जवाहर गेट, गांधी चौक, गौरक्षण चौक, भूतेश्वर चौक



रवीनगर मार्गे समारोप दसरा मैदान होणार आहे.

या स्पर्धा मध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धमध्ये प्रथम येणाऱ्या २१ किमी पुरुष टू व्हीलर मोटर गाडी तसेच २१ किमी महिला साठी टू व्हीलर मोपेड गाडी सोबत इतर गटांसाठी ४ लाख रोख रक्कम, सर्टिफिकेट व मेडल्स बक्षीस स्वरूपात मिळणार आहे.

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून जास्तीत जास्त स्पर्धकांनी आपली नाव नोंदणी www.ataldaud.com या लिंक वर जाऊन ऑनलाइन नाव नोंदणी ७ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ पर्यंत करावी तसेच अधिक माहितीसाठी ९३७२७९०२८१, ८४२१४७८९४९, ९४२१८१९५१४, ९९६००८८९९३, ७२७६८१९७३९, ८४८४९४९९३८, ९८८८१११९१८, ९९२३४२७२१६, ८०८७५४८५००, ९४२१९४६९३४, ९८८१३१५९५८, ९५५२५७७७७८, ९८३४५४०६३८, ७७०९८०००५८ यावर संपर्क साधावा सोबतच मुख्य कार्यालय उदघाटन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भाजपा नेते तुषार भारतीय व अमरावती जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव अतुल पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**असा राहणार वयोगट**

(१) १४ वर्षाआतील मुले ३ किमी मुली ३ किमी
(२) १६ वर्षाआतील मुले ५ किमी मुली ३ किमी
(३) २० वर्षाआतील मुले ८ किमी मुली ५ किमी
(४) ४० वर्षावरील। - पुरुष ५ किमी महिला ५किमी
(५) खुला बर्ग महिला/पुरुष
(रन फॉर अमरावती) ३-:₹.

**खुला वयोगट**

(१) पुरुष व महिला - १० किमी
(२) पुरुष व महिला - २१ किमी

# संस्कृत मधून शपथ घेणारे विदर्भातील एकमेव आमदार ठरलेत प्रतापदादा अडसड

## भगवे-गुलाबी फेटे ते संस्कृतमध्ये शपथ, जाणून आमदारांच्या शपथविधीची वैशिष्ट्ये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

राज्यात महायुतीच्या मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर आज विधिमंडळाच्या सभागृहात विधानसभेच्या नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीला सुरुवात झाली आहे. आज सत्ताधारी पक्षातील आमदार विविध रंगांच्या फेट्यांमध्ये विधिमंडळ परिसरात आल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भाजपा आणि शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) आमदार भगव्या रंगाचे फेटे घालून आल्याचे पाहायला मिळाले. तर राष्ट्रवादीचे (अजित पवार) आमदार गुलाबी रंगाच्या फेट्यांमध्ये दिसले.

**किती आमदारांनी घेतली संस्कृतमध्ये शपथ?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळचे मानले जाणारे भाजपाचे नेते आणि जामनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार गिरीश महाजन यांनी संस्कृतमध्ये आमदारकीची शपथ घेतल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान महाजन यांच्या शपथविधीची सध्या



सर्वत्र चर्चा सुरू आहे. गिरीश महाजन यांच्यानंतर नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरे यांनीही संस्कृतमध्ये शपथ घेतली. पुढे भाजपाचेच पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनीही संस्कृतमध्येच आमदारकीची शपथ घेतल्याचे पाहायला मिळाले. सांगलीचे भाजपाचे आमदार सुधीर गाडगीळ यांनीही यावेळी संस्कृतमध्येच आमदारकीची शपथ घेतली.तर विदर्भातील धामणगाव रेल्वे मतदार संघातील एकमेव तरुण तडफदार अभ्यासू आमदार प्रतापदादा अडसड यांनी हि संस्कृत मध्ये शपथ घेतली हे विशेष.

**अनेक आमदारांकडून जय श्रीरामचे नारे**

आज आमदारांच्या शपथविधीमध्ये सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनीच प्रामुख्याने शपथ घेतल्याचे पाहायला मिळाले. यामध्ये भाजपाच्या काही आमदारांनी जय श्रीरामचे नारे दिले. जुन्नरचे आमदार शरद सोनावणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख केला. तर, दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या आमदारांनी बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचा उल्लेख केल्याचे दिसले.

# बुमराह-सिराजची कमाल टीम इंडियाचं कमबॅक

## ऑस्ट्रेलिया ३३७ वर ऑलआऊट, यजमानांकडे १५७ धावांची आघाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७सिडनी**

ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाविरुद्धच्या दुसऱ्या आणि पिंक बॉल टेस्ट मॅचमधील दुसऱ्या दिवशी १५७ धावांची आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात टीम इंडियाच्या १८० धावांच्या प्रत्युत्तरात ऑलआऊट ३३७ धावा केल्या. ऑस्ट्रेलियासाठी ट्रेव्हिस हेड याने सर्वाधिक धावा केल्या. तर इतर फलंदाजांनी चांगली साथ दिली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला १५० पेक्षा मोठी आघाडी घेता आली. तर दुसऱ्या बाजूला टीम इंडियाकडून जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या दोघांनी प्रत्येकी ४-४ विकेट्स घेतल्या.

ऑस्ट्रेलियासाठी ट्रेव्हिस हेड याने सर्वाधिक धावांचं योगदान दिलं. हेडने ४ सिक्स आणि १७ फोरसह ९९.२९ च्या स्ट्राईक रेटने १४० धावा केल्या. मार्नस लबुशेन याने ६४ धावांची खेळी केली.